शनिवार, २७ एप्रिल २०२४
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - २४१
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SATURDAY 27 APRIL 2024 adhunikkesari.com ●YEAR-03 ●ISSUE-241 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-10 ●PRICE-05




## आमच्या सुजाण वाचकांना विनम्र आवाहन

वृत्तपत्रांच्या जगात दैनिक आधुनिक केसरीने वेगळेपण जपत वाचकांच्या मनात अढळ स्थान मिळवले आहे. हे स्थान टिकवून ठेवताना व्यवहारी जगात पैशांचे सोंग आणणे मात्र अवघड आहे. त्यामुळे आमच्या लाखो सहृदय वाचकांना आम्ही विनम्र आवाहन करत आहोत की, दैनिक आधुनिक केसरी जर आपल्याला आवडत असेल तर ते सुरू ठेवण्यासाठी आपण दररोज
अगदी 1 रुपयापासून पुढे कितीही रुपयांची मदत आम्हाला करू शकता.

आपले आर्थिक योगदान फोन पे नंबरवर किंवा क्यूआर कोडवर किंवा खाते क्रमांकावर देऊ शकता.
State Bank of India, A/c No. 40533797942, IFS code : SBIN0050896

आपली छोटीशी मदत आमच्यासाठी अनमोल आहे.


# डॉ. अनिल सदाशिवराव कांबळे यांना दै. आधुनिक केसरीचा 'आयडॉल महाराष्ट्र' पुरस्कार जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**सुधीर कोर्टीकर**

**छत्रपती संभाजीनगर :** उदगीर जवळील शेल्हाळ या छोट्या खेडेगावातून पुढे आलेले डॉ. अनिल सदाशिवराव कांबळे यांनी आपला वैद्यकीय व्यवसाय सांभाळत सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेतून उदगीर व परभणी जिल्ह्यात विविध सामाजिक उपक्रम राबवून समाजकार्यात मोलाचा वाटा उचलत आहेत. त्यांनी केलेल्या वैद्यकीय व समाज सेवेतील कार्याची दखल घेत दैनिक आधुनिक केसरीने डॉ. अनिल कांबळे यांना 'आयडॉल महाराष्ट्र' हा पुरस्कार जाहीर केला आहे.






दैनिक आधुनिक केसरीच्या माध्यमातून महाराष्ट्रातील विविध क्षेत्रात भरीव कार्य करणाऱ्या व्यक्तींची 'आयडॉल महाराष्ट्र' या पुरस्कारासाठी निवड करण्यात येत आहे. डॉ. अनिल कांबळे यांनी आपला वैद्यकीय क्षेत्रातील व्यवसाय सांभाळत वृक्षारोपण, पर्यावरण संरक्षण, मोफत वैद्यकीय शिबिरे, महिला सक्षमीकरण, परभणी आकाशवाणी केंद्राच्या माध्यमातून आरोग्य शिबिरात सहभाग, खनिज खाणीतील कामगारांच्या मुलांसाठी, आदिवासी मुलांसाठी, नक्षलवाद्याच्या मुलांच्या शिक्षण, घर बांधणी, रस्तेबांधणी अशा कितीतरी सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेतून केलेल्या कार्यासाठी त्यांची निवड राष्ट्रीय खनिज विकास महामंडळाच्या संचालक पदावर करण्यात आलेली आहे.

बालपणापासून डॉ. अनिल कांबळे यांच्या मनात एक सुप्त इच्छा रुजवली गेलेली होती. ती म्हणजे आपण अनुसूचित जाती - जमातीच्या मुला - मुलींसाठी काहीतरी करावे. ते कार्य खऱ्या अर्थाने मग सुरू झाले. डॉ. अनिल कांबळे बीजेपी डॉक्टर असोसिएशनचे अध्यक्ष झाले. अनुसूचित जाती - जमाती मोर्चा बीजेपीचे राज्याचे सदस्य म्हणून निवडले गेले. तसेच लायन्स क्लब, क्वीन्स क्लब, अबोली चॅरिटेबल ट्रस्ट परभणीच्या अध्यक्ष म्हणून देखील त्यांची निवड झाली. असंख्य ठिकाणी त्यांनी स्वतःला सामाजिक क्षेत्रात झोकून देत जोमाने कार्य करत आहेत. केवळ मराठवाड्याच्याच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्राच्या वैद्यकीय क्षेत्राच्या शिरपेचात डॉ. अनिल कांबळे यांच्या कार्याने मानाचा तुरा खोवला गेला आहे. त्यांच्या या सर्व कार्याची व ग्रामीण भागातील, तळागाळातील समाजासाठी कार्य करण्याची तळमळ, सामाजिक बांधिलकी जपत केलेले कार्य याची दखल घेऊनच डॉ. अनिल कांबळे यांना 'आयडॉल महाराष्ट्र' हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. लवकरच छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित कार्यक्रमात या पुरस्कार सोहळ्याचे वितरण करण्यात येणार आहे. या पुरस्कारासाठी निवड झाल्याने सर्वच स्तरांतून डॉ. अनिल कांबळे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# राज्यातील आठ मतदारसंघात 53.51 टक्के मतदान

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** अठराव्या लोकसभा निवडणुकीतील दुसऱ्या टप्प्याच्या मतदानाला शुक्रवारी सकाळपासून सुरुवात झाली आहे. सायंकाळी पाच वाजेपर्यंत राज्यातील आठ मतदारसंघात 53.51 टक्के मतदान झाले आहे. देशभरातील 13 राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशातील एकूण 88 जागांसाठी सुमारे 15.88 कोटी मतदारांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावला आहे. तर महाराष्ट्रातील बुलढाणा, अकोला, अमरावती, वर्धा, यवतमाळ-वाशिम, नांदेड, हिंगोली आणि परभणी या आठ मतदारसंघात शुक्रवारी मतदानाचा रणसंग्राम रंगणार होता. दुपारी पाच वाजेपर्यंत राज्यातील आठ मतदारसंघात सरासरी 53.51 टक्के मतदान झाले. जे की देशातील सर्वात कमी टक्के मतदान असल्याचेही समोर आले आहे. राज्यात आतापर्यंत सर्वाधिक मतदान हे वर्धा मतदारसंघात 56.66 टक्के तर सर्वात कमी हिंगोली लोकसभा मतदारसंघात 52.03 टक्के इतके मतदान झाले आहे.

**वाढत्या उन्हाचा मतदानाला फटका?**

विदर्भ आणि मराठवाड्यातील आठ मतदारसंघात होऊ घातलेल्या दुसऱ्या टप्प्यातील निवडनुकाच्या अनुषंगाने शुक्रवारी मतदानाची रणधुमाळी रंगली. गेल्या काही दिवसांपासून विदर्भ आणि मराठवाड्यात कुठे उन्हाचा तडाखा बघायाला मिळतोय, तर कुठे अवकाळी पावसाचा फटका बसताना दिसत आहे. त्यामुळे संभाव्य वातावरण बघता सकाळच्या सत्रात मतदारांनी अधिका-अधिक मतदान करण्याला पसंती दिली आहे. मात्र दुपारी उन्हाचा पारा वाढताच मतदानात देखील काहीशी घसरण होताना दिसली आहे. त्याचा थेट परिणाम हा मतदानाच्या टक्केवारीवर पडला असल्याचे बोलले जात आहे.

**मतदारसंघनिहाय टक्केवारी पुढीलप्रमाणे**

वर्धा – 56.66 टक्के
अकोला – 52.49 टक्के
अमरावती – 54.50 टक्के
बुलढाणा – 52.24 टक्के
हिंगोली – 52.03 टक्के
नांदेड – 52.47 टक्के
परभणी – 53.79 टक्के
यवतमाळ – वाशिम – 54.04 टक्के

**इव्हीएम मशिन कुऱ्हाडीने फोडली :** नांदेड जिल्ह्यात सर्वत्र मतदान शांततेत सुरू असताना बिलोली तालुक्यातील रामतीर्थ येथे मात्र व्हीव्हीपॅट व इव्हीएम मशिन कुऱ्हाडीने फोडल्याची घटना घडली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले आहे. रामतीर्थ येथील ३ नंबर वार्ड येथे सकाळी ७ वाजता मतदानास सुरुवात झाली. दुपारी ४ वाजेपर्यंत ३७९ पैकी १८५ जणांनी मतदानाचा हक्क बजावला होता. मतदान सुरू असतानाच गावातील तरुण भैय्यासाहेब आनंदराव एडके (वय २५) हा कुऱ्हाड घेऊन थेट मतदान केंद्रात घुसला आणि त्याने कुऱ्हाडीने व्हीव्हीपॅट, इव्हीएम मशिन फोडण्यास सुरुवात केली. त्याने मी एम.ए. झालो असून बेरोजगार आहे, मला नोकरी मिळत नाही असे तो म्हणत होता. त्याच्या हातात कुऱ्हाड दिसताच मतदान केंद्रप्रमुख सुबोध थोरात आणि अन्य कर्मचारी प्रचंड घाबरले होते. मात्र पोलिसांनी तातडीने त्याला ताब्यात घेतले आहे. इव्हीएम मशिन कुऱ्हाडीच्या घावाने फुटली असली, तरी व्हीव्हीपॅट मशिन मात्र सुरू असल्याचे सांगण्यात आले. तसेच केंद्रप्रमुखाकडे असलेल्या मशिनमध्ये मतदानाचा पूर्ण डाटा जशास तसा असल्याने मतदान प्रक्रियेमध्ये कुठलीही अडचण आली नाही. त्यानंतर नवीन इव्हीएम व व्हीव्हीपॅट मशिन मागवून पुन्हा मतदान सुरू करण्यात आले.

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला प्रा.सुरेश नवलेंची सोडचिठ्ठी

## उद्धव ठाकरेंविरुद्ध उठाव केलेल्या शिंदेसेनेतही आता बंडाला सुरूवात

आधुनिक केसरी न्यूज


**छत्रपती संभाजीनगर :** शिंदे सेनेच्या विद्यमान खासदारांच्या उमेदवाऱ्या भाजपने अहवाल नकारात्मक असल्याचे कारण पुढे करून नाकारायला लावल्या. मुख्यमंत्री एकनाथ शिंदेही भाजपच्या दबावापुढे हतबल झाल्याचे चित्र स्पष्ट झाले. विद्यमान खासदारांना उमेदवारी मिळत नाही. याबाबत आपण आवाज उठवल्यानंतर आपल्याशी संवाद होईल अशी अपेक्षा होती, मात्र मुख्यमंत्र्यांसह पक्षाच्या सर्वच नेत्यांनी अघोषीत बहिष्कार टाकल्याने आपण जास्तकाळ बहिष्कृतपणा सहन करू शकत नाही. त्यामुळे शिवसेना पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा देत असल्याचे सांगून माजीमंत्री सुरेश नवले यांनी पक्षाला रामराम केला. उध्दव ठाकरे यांच्या नेतृत्वाविरूध्द उठाव केलेल्या एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत निर्माण झालेल्या अस्वस्थतेविरूध्द प्रा.नवले यांनी उघडपणे बंड करून पक्ष सोडल्याने शिंदेसेनेतील अस्वस्थता चव्हाट्यावर आली आहे.

महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर प्रचार, बैठका, मेळावे, सभांची रणधुमाळी सुरू असताना व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे छत्रपती संभाजीनगरात असतानाच शिवसेना शिंदे गटाला धक्का बसला आहे. सुरेश नवले यांनी गुरूवार, दि.25 एप्रिल रोजी पत्रकार परिषदेत घेत शिवसेना पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा देण्याची घोषणा केली. 29 एप्रिलला बीडमध्ये मराठवाड्यातील सर्वसामान्य कार्यकर्त्यांशी चर्चा करून पुढील राजकारणाबाबत निर्णय घेण्यात येणार असल्याची घोषणा केली. नवले पुढे म्हणाले की, राज्यात मनोज जरांगे पाटील यांची फसवणूक असो किंवा परशुराम आर्थिक महामंडळ प्रश्नी ब्राह्मण बांधवांची फसवणूक असो किंवा धनगर बांधवांना



झुलवत ठेवणे असो याच्या केंद्रस्थानी कोणता पक्ष आहे, याची माहिती जनतेला आहे. मित्रपक्षाने हे सर्व निर्णय घेऊ दिले नाहीत. शिवसेनेच्या खांद्यावर बसून भारतीय जनता पक्ष सत्तेचे फळ चाखत आहे, असे असताना शिवसेनेत पाच वेळा खासदार असलेल्यांना सर्वेक्षणाचे अहवाल दाखवून, भाजप शिवसेनेतील उमेदवार ठरवित असल्याचा आरोप नवले यांनी केला. या दबावतंत्रामुळे अनेक शिवसैनिक नाराज आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे शिवसैनिकांचे ऐकत नाहीत. यामुळे आपण पक्ष सोडत असल्याचे त्यांनी सांगितले.ङ्गनाशिकमध्ये शिवसेनेचे खासदार हेमंत गोडसे यांचा बळी जातो का, असा सवाल केला होता. छत्रपती संभाजीनगर लोकसभा मित्र पक्ष घेण्याच्या तयारी होता. ऐनवेळी आवाज उठविल्याने छत्रपती संभाजीनगर लोकसभा क्षेत्रातून शिवसेनेचा उमेदवार देण्यात आला, असा दावाही नवले यांनी केला. प्रभू रामचंद्र मित्र पक्षापासून मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचे रक्षण करो ङ्गप्रभू रामचंद्र मित्र पक्षापासून मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचे रक्षण करो शिवसेनेने नेते व उपनेते यांच्या भावना व्यक्त केल्या. ज्यांनी आपले स्वतःचे आयुष्य पणाला लावून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे नेतृत्व स्वीकारले होते. मुख्य नेता म्हणून त्यांची निवड केली. त्यांना साधी लोकसभेची उमेदवारी मिळू शकली नाही, ही त्यांच्या आयुष्यातील शोकांतिका आहे. पक्ष चालवत असताना मित्र पक्षाच्या दबावाला बळी पडू नाही. आपला पक्षांच्या सैनिकांना न्याय दिला पाहिजे. जर त्यांना न्याय मिळत नसेल, तर त्यांनी कोणाकडे पाहेच हा प्रश्न निर्माण होतो. प्रभू रामचंद्राला साकडे घालतो की, मित्र पक्षांपासून आमचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे संरक्षण करो, या शब्दांत सुरेश नवले यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. शिवसैनिक आणि जनता याचे उत्तर देईल. नाशिकची उमेदवारी या क्षणापर्यंत का जाहीर झाली नाही? हेमंत गोडसेंना पाच वेळेस शक्तिप्रदर्शन करावे लागले. जे तुमच्या सोबत आले त्यांना एक क्षणाचा विलंब न करता त्यांना उमेदवारी मिळायला हवी होती. अनेकांच्या मनात अशीच खदखद आहे. लोकसभेच्या निवडणुकीनंतर शिवसैनिक आणि जनता याचे उत्तर देईल, असा इशारा सुरेश नवले यांनी दिला.

# उगवतीचे रंग



# बाग फुलवणारा एक योगी अवलिया

विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी


त्यात विशेष करून संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम यांचे अभंग, कबीर, मीराबाई यांच्या रचना आदींचा समावेश असायचा. बागेतील झाडेसुद्धा त्याच्याबरोबर त्या भक्तिरसात तल्लीन व्हायची. भजनाव्यतिरिक्त इतर गाणी कधी ऐकताना तो कधी दिसला नाही. मग बऱ्याच वेळा माझ्या आणि त्याच्या गप्पा जमायच्या. विषय आध्यात्म हाच असायचा. त्याने त्याच्या परीने स्वतःशी बाळगलेली अशी काही तत्त्वं होती. मद्यपान करणाऱ्या, गैरमार्गाने पैसा कमावणाऱ्या व्यक्तींनी त्याला कितीही पैसे देऊ केले तरी तो त्यांच्याकडे कामाला जात नसे. अशा व्यक्तींकडील पाणी सुद्धा तो घेत नसे. मीच त्याला म्हणायचो, ' तुम्हाला अशा ठिकाणी जायला काही हरकत नाही. भलेही तुम्ही त्यांच्याकडील काही खाऊ पिऊ नका. तुमचे काम करा आणि पैसे घ्या. ' पण आपल्या मनाशी ठरवलेल्या तत्वांशी तो कमालीचा एकनिष्ठ होता. पैशासाठी, लोभासाठी आपल्या तत्वांशी त्याने प्रतारणा कधीच केली नाही. कधी कधी त्याचं याबाबतीत स्पष्ट बोलणं, अशा लोकांशी फटकून वागणं यामुळे काही लोकांना तो फटकळ, लहरी आणि अप्रिय वाटायचा. पण अशा लोकांशी त्याला काही देणंघेणं नव्हतंच. त्याचं बोलणं, त्याची भाषा बऱ्याच वेळेला अशुद्ध, ग्राम्य अशी असायची. पण तो जे काही सांगायचा ते मात्र फार मोलाचे. तो खरं तर बागकाम करणारा एक माळी. दुसऱ्या भाषेत सांगायचं तर झाडांचा डॉक्टर. पण ज्या व्यक्तीला झाडांचे आरोग्य कळते, त्या व्यक्तीला मानवी आरोग्यही बऱ्यापैकी समजते.



# हितगुज



पुष्प ५०वे



गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे, दिंडोरी (नाशिक)

## मानवधर्म हाच भारतीय धर्म

उत्तम गुण, लक्षणें, आहार, आचार, विचार यातून मनुष्यत्वाची जोपासना होऊन आयुष्याला उच्च, उदात्त ध्येय प्राप्त होते. आपल्या तत्त्वज्ञानात्मक सर्व ग्रंथात सनातन धर्माचे चित्रण आहे. हा वर्णाश्रम धर्म नाही. वर्णाश्रम स्मृतिंवर आधारित आहे. स्मृति देश कालादि नुसार परिवर्तनीय आहेत. आज वर्णाश्रम कालबाहय, अनावश्यक व अस्वीकृत आहे. सनातन धर्म सार्वभौम श्रुतिंवर आधारलेला आहे. त्यात शाश्वत मूल्ये कथन केली आहेत. सनातन धर्म आचरण, चरित्र यावर आधारलेला आहे, जात किंवा जन्मावर नाही. म्हणून सर्व जाती-धर्माच्या जनतेसाठी उपयुक्त असा तो मानवधर्म किंवा भारतीय धर्म आहे. त्यांच्या आधारे समस्त भारतीय जनतेवर नैतिक, आध्यात्मिक संस्कार करणे सहज शक्य आहे. महात्मा गांधींनी याच धर्माच्या आधारे राष्ट्रभक्ती बलवान केली व सामान्य जनतेत निर्भयता, शौर्य, त्याग व बलिदानाची प्रेरणा उत्तुंग बनवली. भगवान श्री स्वामी समर्थांची सेवा या वासुदेव-धर्मावर आधारलेली आहे. भगवान श्री स्वामी समर्थांच्या जीवनोल्लेखानुसार ते हिंदू-मुस्लिम, पारशी, ख्रिश्चन सर्वांचे मार्गदर्शक, कृपादाता आहेत. वेगवेगळ्या प्रसंगांतून त्यांनी राव, रंक, स्त्री-पुरुष, दरिद्र व सत्ताधारी, ज्ञानी-अज्ञानी, व्यक्तींना आत्मजागृत करून सन्मार्गाला लावले आहे. श्री स्वामी समर्थ सर्व जाती-धर्माच्या, सर्व प्रदेशातल्या रहिवाश्यांचे आराध्य दैवत आहे. श्री स्वामी महाराजांनी मठ-मंदिरे बांधली नाहीत. कोणत्याच भिंती उभ्या केल्या नाहीत. भगवान श्री स्वामी समर्थांची सेवा करणारा, त्यांचे आध्यात्मिक संदेश प्रसारित करणारा दिंडोरी प्रणित मार्ग मानव ऐक्यावर आधारित मार्ग आहे. हा ज्ञानबोधाचा, आत्मजागृतीचा मार्ग आहे.


संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक
संपर्क क्र. ९९२२४२००३४



# आनंदी पहाट

## शिक्षणासाठी मनोवैचारिकता आवश्यक

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

शिक्षण सांस्कृतिक मूल्ये आणि नियम शिकवून मुलांना समाजात सामील करते. हे त्यांना समाजाचे उत्पादक सदस्य बनण्यासाठी आवश्यक कौशल्यांसह सुसज्ज करते. अशा प्रकारे, ते आर्थिक वाढीस उत्तेजन देते आणि स्थानिक त्याचप्रमाणे जागतिक समस्यांबद्दल जागरूकता वाढवते. संघटित संस्था शिक्षणाच्या अनेक पैलूंवर परिणाम करत असतात. शिक्षण यशस्वी होते की नाही; यावर अनेक घटक प्रभाव टाकतात. मनोवैज्ञानिक घटकांमध्ये प्रेरणा, बुद्धिमत्ता आणि व्यक्तिमत्व यांचा समावेश होतो. सामाजिक घटक, जसे की सामाजिक-आर्थिक स्थिती, वांशिकता आणि लिंग, अनेकदा भेदभावाशी जोडलेले असतात. शिक्षणाचे अनेक प्रकार आहेत; औपचारिक शिक्षण हे सार्वजनिक शाळांसारख्या काही विशिष्ट धाटणीच्या संस्थात्मक चौकटीत होते. अनौपचारिक शिक्षण देखील संरचित आहे; परंतु ते औपचारिक शालेय शिक्षण प्रणालीच्या बाहेर होते. अनौपचारिक शिक्षण म्हणजे दैनंदिन अनुभवातून असंरचित शिक्षण होय. औपचारिक आणि अनौपचारिक शिक्षण हे ह्या दोन स्तरांमध्ये विभागले गेले आहे. त्यामध्ये बालपणीचे शिक्षण, प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण आणि उच्च स्तरीय शिक्षण यांचा समावेश होतो. शिक्षण म्हणजे ज्ञान, कौशल्ये आणि चारित्र्यगुणांचा प्रसार असे म्हणता येईल. तिची नेमकी व्याख्या विवादित आहे आणि शिक्षणाची उद्दिष्टे काय आहेत तसेच गंभीर विचारसरणीला प्रोत्साहन देऊन शिक्षण किती प्रमाणात वेगळे आहे; याबद्दल देखील अनेक मतभेद आहेत. हे मतभेद शिक्षणाचे प्रकार कसे ओळखायचे, मोजायचे आणि सुधारायचे ह्यावर परिणाम करतात. शिक्षण हा शब्द सुशिक्षित लोकांच्या मानसिक स्थिती आणि गुण त्याचप्रमाणे शैक्षणिक घटनांचा अभ्यास करणाऱ्या शैक्षणिक क्षेत्राचा देखील संदर्भ घेऊ शकतो. अनेक वर्गीकरणे ही अध्यापन पद्धतीवर लक्ष केंद्रित करतात, जसे की शिक्षक-केंद्रित आणि विद्यार्थी-केंद्रित शिक्षण होय. विज्ञान शिक्षण, भाषा शिक्षण आणि शारीरिक शिक्षण यासारख्या विषयानुसार शिक्षणाचे स्वरूप देखील ओळखले जाऊ शकते.



आधुनिक केसरी

## सगुण निर्गुण | तुचि एक ||

विठ्ठला तुझा रे | गवसला ठाव ||
चित्ती माझा भाव | वास तेथे ||१||
मनाच्या गाभारी | आत्म्याचे चिंतन ||
नामसंकीर्तन | तुझे चाले ||२||
ज्ञाना तुका ठायी | एक तुझे रूप ||
पाहतो स्वरूप | चराचरी ||३||
यज्ञ कर्म चाले | नित्य अभंगात ||
तोचि खरा संत | जाण जीवा ||४||
आता न उरले | मी तू हे बंधन ||
सगुण निर्गुण | तुचि एक ||५||




प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

देह आत्म मन शान्ति है,
ताप क्षीण वल आय ।
हँस अमर आनन्द है, अमृत पियत अघाय
।।६५।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल दशम अध्याय) ०२/१०/६५

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
त्या अमृत प्रवाहाने आत्मा आणि मनाला शांती मिळते. शरीर आणि मनाचा ताप नष्ट होऊन, जीवन प्राप्त होते आणि आत्मा अमृत परमानंदास प्राप्त करून पूर्ण तृप्त होऊन जातो.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## गुणरूपनिरूपण

आधुनिक केसरी




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

गुणरूपनिरूपणाच्या दुसऱ्या टप्प्यात म्हणजेच ३१ व्या ओवीकडे आपण आलो आहोत. यामध्ये आपण "विश्व निर्माण कसे झाले"? याचा अभ्यास करत आहोत. आपण आतापर्यंत अभ्यासले की पाच भूतामध्ये एकापेक्षा एक असे मोठे होत आहेत. तर आता आपण पंचमहाभूताहून वरिष्ठ कोण स्वतंत्र कोण? असा विचार केला तर काही प्रश्न पडल्या वाचून रहात नाहीत. त्यांचा थोडासा साधकबाधक विचार आपण करूया, जेथे मूळमाया पाच भूतांची बनलेली आहे तेथे हा विचार थांबतो. कारण हे विश्व पंचमहाभूतांचे बनलेले आहे हे आपण या ठिकाणी मान्य केले आहे. पण मूळमायेच्या पलीकडे निर्गुण ब्रह्म तेवढे आहे. पाच भूते आपल्या स्थूल दृष्टीला जड व दृष्य भासतात. पण सुक्ष्म दृष्टीने पाहिले तर ती जाणिवेची रूपे आहेत. जाणीव म्हणजे "शक्ति" आणि ही शक्ति या दृष्य विश्वामध्ये जिकडे तिकडे या जाणीव नेणीवेच्या पलीकडे असणारी पण दृष्य रूपात संचार करणारी ही शक्ति आहे.

# परमात्म्यावर पूर्ण निष्ठा पाहिजे

आधुनिक केसरी



आईकरिता रडत असलेले मूल आई भेटल्याशिवाय रडणे थांबवत नाही, त्याप्रमाणे, समाधानाकरिता, आनंदाकरिता, धडपडणारा आपला जीव, परमेश्वर प्राप्त झाल्याशिवाय शांत राहू शकत नाही. म्हणून प्रपंचाची काळजी न करता, परमेश्वराची प्राप्ती कशी होईल याची काळजी करा. भगवंतावर संपूर्णपणे निष्ठा ठेवल्याशिवाय आपली प्रपंचाची काळजी दूर होणार नाही. सर्व जगताचा जो पालनकर्ता, तो आपले पालन नाही का करणार ? प्रत्येक गोष्ट त्याच्याच सत्तेने होते हे लक्षात ठेवा, मग प्रपंच कधीही बाधक होणार नाही. एक भगवंतावरची निष्ठा मात्र शेवटच्या श्वासापर्यंत सांभाळा. आपण पुराणात वाचलेच आहे की, भीष्माने पांडवांना मारण्याची प्रतिज्ञा केली. भीष्मप्रतिज्ञाच ती, मग ती खोटी कशी होऊ शकेल? सर्व पांडव चिंताग्रस्त झाले, पण द्रौपदीची निष्ठा मात्र जबरदस्त होती. ती म्हणाली, "आपण श्रीकृष्णाला विचारू." तिने सर्व वृत्तांत त्याला कथन केला. श्रीकृष्ण म्हणाला, "भीष्माची प्रतिज्ञा खोटी कशी होईल ? तरी आपण एक प्रयत्न करून बघू." तो म्हणाला, "द्रौपदी, तू आता असे कर, रात्री भीष्माचार्यांच्या आश्रमात जा. तिथे फक्त संन्याशांना आणि स्त्रियांना मुभा आहे. मी तुझ्याबरोबर आश्रमापर्यंत येतो." त्यानंतर श्रीकृष्ण द्रौपदीला घेऊन भीष्माचार्यांच्या आश्रमापर्यंत गेले आणि बाहेरच तिचे अलंकार आणि इतर वस्तू सांभाळत बसले. श्रीकृष्णांनी तिला आत जाताना सांगितले की, "भीष्माचार्य आता झोपत आहेत, अशा वेळी तू आत जा आणि बांगड्या वाजवून नमस्कार कर." त्याप्रमाणे द्रौपदी आत गेली, आणि बांगड्या वाजवून भीष्माचार्यांना तिने नमस्कार केला. त्यांनी लगेच तिला "अखंड सौभाग्यवती भव" म्हणून आशीर्वाद दिला. मग त्यांनी पाहिले तो द्रौपदी ! तेव्हा ते म्हणाले, "द्रौपदी ही अक्कल तुझी खचित नव्हे; तुझ्याबरोबर कोण आहे ते सांग." ती म्हणाली, "माझ्याबरोबर गडी आणला आहे; तो बाहेर उभा आहे." भीष्माचार्यांनी बाहेर येऊन पाहिले. त्यांनी श्रीकृष्णाला ओळखले, परंतु आता सर्व काम होऊन चुकले होते. म्हणून म्हणतो, परमात्म्यावर पूर्ण निष्ठा पाहिजे. या निष्ठेच्या आड जर काही येत असेल तर तो म्हणजे आपला अभिमान. हा अभिमान सर्वांना घातक आहे. तो घालवण्यासाठीच परमात्म्याला वारंवार अवतार घेणे भाग पडले. ही अभिमानाची हरळी नाहीशी व्हायला भगवंताच्या नामासारखा दुसरा उपाय नाही. नामावर प्रह्लादाने जशी निष्ठा ठेवली तशी ठेवावी. त्याने नाम श्रद्धेने घेतले आणि निर्विषय होण्याकरिता घेतले, आपण ते विषयासाठी घेऊ नये. नामापरते दुसरे सत्य नाही हे समजावे. याच जन्मात हे नाम शांतीचा आणि समाधानाचा ठेवा मिळवून देईल.

## निरूपण

आधुनिक केसरी

ऐसें सांगतां बहुत । होती वन्हीचे आघात ।
तेणे दुःखें दुःखवे चित्त । या नांव आदिभूतिक ॥ ४४॥
हारपे विसरे आणी सांडे । नासे गाहाळ फुटे पडे ।
असाध्य होये कोणीकडे । या नांव आदिभूतिक ॥ ४५॥
प्राणी स्थानभ्रष्ट जालें । नाना पशूतें चुकलें ।
कन्यापुत्र गाहाळले । या नांव आदिभूतिक ॥ ४६॥

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शनिवार, २७ एप्रिल २०२४
adhunikkesari.com

# वृत्तपत्र खरेदी करणाऱ्यांना आयकरात सूट द्या

## वसंत मुंडेंच्या नेतृत्वातील शिष्टमंडळाचे चंद्रकांत खैरेंना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** वृत्तपत्र खरेदी करणाऱ्यांना उत्पन्न करात वार्षिक 5 हजार रुपये सूट द्यावी, ही मागणी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाने केंद्र सरकारकडे लावून धरली आहे. वृत्तपत्रांना ऊर्जितावस्था मिळवून देण्यासाठी ही मागणी होत असून आज छत्रपती संभाजीनगर लोकसभा महाविकास आघाडीचे उमेदवार चंद्रकांत खैरे यांना पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या नेतृत्वाखालील मंडळाने या विषयी एक निवेदन दिले. या वेळी चंद्रकांत खैरे यांनी पत्रकार संघाच्या मागणीला पाठिंबा दिला आहे.
महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने महाविकास आघाडीचे उमेदवार चंद्रकांत खैरे यांची भेट घेऊन चर्चा केली. कोरोना वैश्विक महामारीनंतर महाराष्ट्रासह संपूर्ण देशात वृत्तपत्र व्यवसायावर मोठा परिणाम झाला आहे. वृत्तपत्रांचा खप आणि जाहिरातींचे प्रमाणही कमी झाले आहे. परिणामी वृत्तपत्र व्यवसायावर अवलंबून असलेले पत्रकार आणि इतर कर्मचाऱ्यांसमोर रोजगाराचा प्रश्न निर्माण झाला आहे. देशभरात छोट्या-मोठ्या वृत्तपत्रांचा 35 हजार कोटी रुपयांचा व्यवसाय अडचणीत आला आहे. यासाठी केंद्र सरकारने वृत्तपत्र खरेदी करणाऱ्या आयकरदात्यांना उत्पन्न करात वार्षिक 5 हजार रुपयांची सूट द्यावी, अशी मागणी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केली. या मागणीला चंद्रकांत खैरे यांनी पाठिंबा देत या निवडणुकीत आपला विजय झाल्यास लोकसभेत हा विषय प्राधान्याने मांडला जाईल, असे आश्वासन दिले. या वेळी संपादक संतोष मानूरकर, पत्रकार संघाचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष वैभव स्वामी, छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रभू गोरे, प्रसिद्धी प्रमुख संदीप घंटे, सचिन उबाळे आदींची उपस्थिती होती.





# दैनिक आधुनिक केसरीच्या रामनवमी पुरवणीचे पांडुरंग जोशी यांच्या हस्ते विमोचन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** दैनिक आधुनिक केसरीच्या रामनवमीच्या विशेष पुरवणीचे विमोचन सिडको एन -३ मधील विघ्नहर्ता गणेशमंदिराचे पुजारी श्रीमान.पांडुरंग पुजारी यांच्या शुभहस्ते करण्यात आले. रामनवमीची ही पुरवणीचे प्रायोजकत्व भावे आणि कंपनीनी स्विकारलेले आहे.
दैनिक आधुनिक केसरीची ही विशेष पुरवणीचे विमोचन करताना श्रीमान.पांडुरंग जोशी , सार्थक जोशी , निला गोगटे , नलीनी येवले , नयन कोर्टीकर अशी भक्तमंडळी दिसतं आहेत. विघ्नहर्ता गणेशमंदिरात भक्ताच्या वाचनासाठी लावण्यात आलेली आहे.

# कोपरगावात अवैध गुटखा पकडला

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** तालुक्यातील पुणतांबा फाटा येथे काल दुपारी ०३ वाजेच्या सुमारास अ.नगर येथील स्थानिक गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या धडक कारवाईत १० पोत्यापेक्षा जास्त गुटखा,विविध पुडे,महिंद्रा पिकअप (क्रं.एम.पी.४६ जी.२३५७) रंगेहात पकडली असून त्यातील माल पोलिसानी जप्त केला असून यातील पाच आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला असून यातील दोन आरोपी जेरबंद केले असून कोपरगाव येथील आरोपीसह तीन फरार झालं असल्याची माहिती हाती आली आहे.त्यामुळे कोपरगाव शहर आणि तालुक्यातील गुटक्यातील बेबंदशाही उघड झाली असून कोपरगाव पोलिसांना अंतर्मुख होण्याची वेळ आली आहे.

सदरचे सविस्तर वृत्त असे की,कोपरगाव शहर आणि तालुक्यात अलीकडील काळात अवैध व्यवसाय मोठ्या प्रमाणात फोफावला असल्याचे वारंवार आढळून येत आहे. त्यामुळे नगर स्थानिक गुन्हे शाखेची या शहर आणि परिसरात वक्रदृष्टी झाली असून पूर्वी या शाखेच्या पथकाला मिळालेल्या गुप्त खबरीनुसार कोपरगाव तालुका हद्दीत सुरेगाव हद्दीत दि.०८ मे २०२३ रोजी केलेल्या कारवाईत तीन आरोपी व गुटख्याच्या दोन गाड्या जप्त केल्या होत्या.यातील ६.११ लाखांचा मुद्देमाल जप्त केला होता.त्या घटनेस अकरा महिने उलटत आले असताना पुन्हा एकदा अ.नगर येथील स्थानिक गुन्हे शाखेने कोपरगाव तालुक्यात मोठ्या प्रमाणावर सुरु असलेल्या गुटक्याला पायबंद घालण्यास सुरुवात केली असून कोपरगाव पोलिसांच्या डोळ्यात अंजन घातले असल्याचे मानले जात आहे.पाळत ठेवून केलेल्या कारवाईत नगर-मनमाड व कोपरगाव-संगमनेर रोडवरील चौफुलीवरुन सदर महिंद्रा पिकअप दुपारी ०३ च्या सुमारास जाणार असल्याची माहिती मिळाल्याने त्यांनी त्या ठिकाणी पोलिसांनी साध्या वेशातील आपली माणसे पेरून ठेवली होती.त्या मार्गावर गाडी आल्यावर त्यांनी तिला थांबवले असता त्यांना मिळालेल्या माहितीची त्यांनी खात्री केली असता ती माहिती खरी निघाली होती.
दरम्यान स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी केलेल्या कारवाईत त्यांना ०४ लाख ३५ हजार ६०० रुपयांचे १० पोते त्यात पिवळ्या रंगाच्या १० गोण्या व प्रत्येक गोणीवर विमल पान मसाला असे नाव असलेली प्रत्येकी दहा पुडे त्यावर प्रत्येक पुडीवर किंमत रुपये १९८ रुपये,४८ हजार रुपये किमतीच्या तंबाकु नाव असलेल्या १० गोण्या पुड्या,०४ लाख ११ हजार ८४० रुपयांच्या दहा सिल्व्हर रंगाच्या मोठ्या गोण्या,त्यात चार लहान गोण्या,त्यात राज निवास सुगंधित पान मसाला,त्या शिवाय ०१ लाख ०५ हजार ६०० रुपयांच्या २ फिक्कट गुलाबी गोण्या,या शिवाय ०६ लाख रुपये किमतीची एक महिंद्रा कंपनीची वरील क्रमांकाची पांढऱ्या रंगाची गाडी असा एकूण १६ लाख ०१ हजार ४४० रुपयांचा ऐवज जप्त केला आहे. यातील आरोपी राजू उत्तम भिल (वय-३२)रा.गवाडी,ता. निवाली जि.बडवानी मध्य प्रदेश,मितेश राजू भाबड,(वय-२८) रा.अंबिकापुरी इंदोर मध्यप्रदेश,अभय गुप्ता रा.छोटा बंगरदा रोड, इंदोर, मध्यप्रदेश, आदींना पोलिसांनी अटक केली असून यातील योगेश कटाळे,रा.कोपरगाव व किरण लामखडे रा.घारगाव, ता.संगमनेर हे दोघे मात्र फरार झाले असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

# दुष्काळातही वनबन हिरवेगार : डोमेगावच्या सविता शेळकेंचा अनोखा उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** गाव हागणदारीमुक्त करण्यासाठी स्वखर्चाने 225 शौचालये बांधून देणाऱ्या सविता बाबासाहेब शेळके यांनी दुष्काळ व पाणीटंचाईतही गावातील वनबन व नर्सरी हिरवीगार ठेवली आहे.

दागिने गहाण ठेवून व कर्ज काढून डोमेगावात स्वखर्चाने 225 शौचालये बांधून लक्ष वेधून घेतलेल्या सविता बाबासाहेब शेळके यांनी डोमेगावात दारुबंदीसाठीही पुढाकार घेतला होता. यंदा जालना जिल्ह्यात दुष्काळ पडला आहे. जिल्ह्यातील अनेक गावात भीषण पाणी टंचाई निर्माण झाली आहे. डोमेगाव ग्रामपंचायतीमध्ये पाणी पुरवठा कर्मचारी म्हणून सेवेत असलेले बाबासाहेब शेळके यांनी स्वखर्चाने गावातील सार्वजनिक पाणी पुरवठा करणाऱ्या विहिरीत वाढीव बोअर घेऊन डोमेगावची तहान भागविली आहे. वाढत्या तापमानामुळे सर्वत्र विहीर व बोअर आटल्या आहेत. डोमेगावही टँकरभरोसे झाले आहे. गावातील पाणी टंचाई निर्मूलनासाठी पुढाकार घेणारे शेळके दाम्पत्य पर्यावरणीय कार्यातही अग्रेसर आहे. डोमेगावात ग्रामपंचायतच्या माध्यमातून सविता शेळके यांनी सुरू केलेली नर्सरी दुष्काळ आणि पाणी टंचाईच्या काळातही हिरवीगार आहे. या ठिकाणी असलेले वनवनही दुष्काळ व पाणी टंचाईच्या काळात हिरवेगार आहे. गाव टँकरभरोसे झाल्यानंतर बोअरवेलच्या पाण्यावर सविता शेळके यांनी वनबन व नर्सरी हिरवेगार ठेवली आहे. या नर्सरी व वनबनमधील झाडे दुष्काळी वातावरणातही हिरवेगार आहेत. झाडी वाचली पाहिजेत, पर्यावरणीय समतोल राखला गेला पाहिजे, या विचाराने सविता शेळके यांनी झाडे जमविण्यासाठी धडपड सुरू ठेवली आहे.





# न्यायालयाचे डिजिटायझेशन

आधुनिक केसरी

सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी डिजिटायझेशनच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत, गुरुवारी सर्वोच्च न्यायालय व्हॉट्सअॅप संदेशांद्वारे वकिलांना खटले दाखल करणे आणि सूचीबद्ध करण्याशी संबंधित कारण सूची आणि माहिती सामायिक करेल, अशी घोषणा केली. सरन्यायाधीश म्हणाले की याचा खूप प्रभावशाली परिणाम होईल आणि हे पाऊल कागद आणि पृथ्वी वाचविण्यास  मदत करेल. व्हॉट्सअॅपच्या माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञान (आयसीटी) सेवांसह एकीकरणाची घोषणा सरन्यायाधीशांनी त्यांच्या नेतृत्वाखालील नऊ न्यायमूर्तींच्या खंडपीठाने खासगी मालमत्तांचा विचार केला जाऊ शकतो की नाही या याचिकांमुळे उद्भवलेल्या त्रासदायक कायदेशीर प्रश्नावर सुनावणी सुरू करण्यापूर्वी केली होती. राज्य धोरणाच्या निर्देशात्मक तत्त्वांचा (डीपीएसपी) भाग असलेल्या घटनेच्या अनुच्छेद ३९(ब) अंतर्गत खासगी मालमत्तांना 'समाजाची भौतिक संसाधने' मानता येईल का, असा प्रश्न याचिकांमध्ये विचारण्यात आला होता. सरन्यायाधीश म्हणाले, "सर्वोच्च न्यायालयाच्या अमृत महोत्सवात आम्ही एक छोटी योजना सुरू केली आहे. व्हॉट्सअॅप आपल्या दैनंदिन जीवनाचा एक भाग बनले आहे आणि एक शक्तिशाली संज्ञापन साधनाची भूमिका बजावत आहे. न्याय मिळवण्याच्या अधिकाराला बळकटी देण्यासाठी आणि न्याय व्यवस्थेत पारदर्शकता वाढवण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने आपल्या माहिती तंत्रज्ञान सेवांचे व्हॉट्सअॅपबरोबर एकत्रीकरण करण्याची घोषणा केली आहे. या उपक्रमांतर्गत 'अॅडव्होकेट्स ऑन रेकॉर्ड' आणि सर्वोच्च न्यायालयासमोर वैयक्तिकरित्या उपस्थित राहणाऱ्या याचिकाकर्त्यांना ऑनलाइन दावे, याचिकांची यादी, आदेश आणि निकाल यासंबंधी स्वयंचलित संदेश प्राप्त होतील, असेही न्यायमूर्ती चंद्रचूड म्हणाले. वेबसाइटवर उपलब्ध असलेले आदेश आणि निर्णय व्हॉट्सअॅपच्या माध्यमातून पाठवले जातील, असे त्यांनी सांगितले. महाधिवक्ता तुषार मेहता यांनी सरन्यायाधीशांच्या या निर्णयाचे स्वागत केले. 'हे एक क्रांतिकारक पाऊल आहे,' असे ते म्हणाले.



राम कुलकर्णी,
संपर्क 9422742577

# लोकांच्या संपत्तीवर काँग्रेसचा डोळा

आधुनिक केसरी

**देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सर्वाधिक नेतृत्व कॉंग्रेस पक्षाने केलं यात शंका नाही. आम्हीच जणु काही देशाचे मालक हाच दृढ भाव काँग्रेसवाल्यांच्या हृदयात घर करून बसला. हम बोले देश चाले या उक्तीप्रमाणे वर्षानुवर्षे कारभार करताना ना जनतेचा विकास ना सुधारणा घराणेशाही, बेबंदशाही, भ्रष्टाचार त्यातुन जन्माला घातलेला सैराचार पिढ्यानपिढ्या सत्ता चालवताना मक्तेदारीची चळवळ या देशात काँग्रेसवाल्यांनी राबवली. शेवटचा माणुस कधीच दृष्टी पडला नाही.**

जनतेचे शोषण करणं त्यांच्या रक्ताचा जणु काही अविभाज्य घटक होवुन बसला. म्हणुनच की काय काँग्रेस नेता शाम पित्रोदा अमेरिका देशातील वारसा कराराच्या तरतुदीचं कौतुक करून अशा गोष्टी आपल्याकडे लागु करण्यावर ते बोलले. अर्थात सामान्य जनतेच्या संपत्तीचं पुर्नवाटप याचाच अर्थ काँग्रेस त्यांच्या कर्माने अधःपतनाला जात असताना देखील देशातील सामान्य गोरगरिब जनतेच्या घामाच्या संपत्तीवर काँग्रेसचा डोळा असुन वारसा कराराची तरतुद करायलाच हवी. हा विचार त्यांच्या बोलण्यातुन पुढे येणं म्हणजे काँग्रेसची नियत गोर गरिबांविषयी कशी स्वार्थ आहे? हे स्पष्ट झालं. शाम पित्रोदा श्रीमती सोनिया गांधी घराण्याचे अत्यंत स्नेही असुन पक्षाचे जेष्ठ नेते म्हणुन त्यांच्याकडे पाहिल्या जातं. इंडिअन ओव्हरसीज काँग्रेस अध्यक्ष हे पद देखील त्यांच्याकडे आहे. अमेरिकेमध्ये वारसा कराराची तरतुद संपत्तीच्या पुनर्वाटपाची चर्चा हा कायदा तिथे आहे. अशा गोष्टीकडे भारताने लक्ष्य द्यायला हवं. हा विचार पित्रोदा यांनी मांडला. त्यांच्या बोलण्याचा अर्थ स्पष्टपणे असा निघतो की, सामान्य जनतेने घाम गाळुन जमा केलेल्या संपत्ती फेरवाटपाच्या तेही अल्पसंख्यांकांना देवुन टाकण्याच्या यावरून काँग्रेसच्या पोटात सामान्य लोकांच्याविषयी कशा प्रकारे पाप आणि त्यांची नियत उघडी पडली. काँग्रेस पक्षाने पित्रोदाचं मत वैयक्तिक असल्याचा खुलासा केला असला तरी एवढ्या मोठ्या जबाबदार जेष्ठ नेत्याचं वैयक्तिक मत असु शकत नाही. कारण जनता एवढी दुधखुळी नाही. पित्रोदा मुलाखतीत काय म्हणाले? यावर नजर टाकली असता अमेरिकेमधल्या एखाद्या माणसाकडे दहा कोटी डॉलरची संपत्ती असेल आणि तो मृत्यू पावला तर ४५ टक्के मालमत्ता मुलांना मिळते व ५५ टक्के मालमत्ता सरकार ताब्यात घेते अर्थात तुमच्या मृत्युनंतर संपत्तीतला विशिष्ट भाग जनतेसाठी ठेवला जाईल असा संदेश त्या देशात असलेल्या वारसा कराराकडून नागरिकांना दिल्या जातो. आपल्या देशात तशा प्रकारचा कायदा आणि सोय नाही. मात्र संपत्ती पुनर्वाटपाचा विचार अमेरिकेसारखा आपल्या देशाने करायला हवा. असं त्यांनी मुलाखतीत स्पष्ट म्हणलं म्हणजेच काँग्रेस पक्षाचं हेच धोरण आहे की भविष्यात देशाचे नेतृत्व आपल्याकडे जर आलं तर वारसा करार हक्क सरकार आणि सामान्य जनता यांच्यातला कायदा अमेरिकेसारखा भारतात लागु केला पाहिजे असंच काँग्रेस नेता पित्रोदा यांना म्हणायचंय. वास्तविक पहाता देशात सरकार कुणाचंही असो? व्यवस्था चालवण्यासाठी वेगवेगळ्या स्वरूपाचे कर ज्यातुन मिळणारा निधी आणि त्यातुन सरकार व्यवस्था चालवते. तेही सामान्य जनतेच्या हितासाठीच. तसं पाहता ज्या काँग्रेसने वर्षानुवर्षे देशाचा कारभार केला मात्र कारभार करताना जनतेच्या हिताचा विचार न करता स्वकियांचे हित पाहिलं ज्यामुळे काँग्रेसवाले गर्भश्रीमंत होवुन बसले. या पक्षात आजही डोकावुन पाहिलं तर प्रस्थापित सरंमजाईशाही आणि ज्यातुन मिळवलेली संपत्ती हीच खरी  त्यांची प्रतिष्ठा म्हणावी लागेल. कराच्या रूपाने मिळालेला पैसा सामान्य जनतेच्या कल्याणकारी योजनेसाठी खर्च केला पाहिजे हे कधी लोकांना कळून चुकलं? २०१४ नंतर देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं सरकार आलं. जीएसटीसारखी एक कर पद्धत त्यांनी आणली खरी पण देशात गोरगरिब कल्याणाच्या एकुण ११०० योजना सुरू केल्या. रस्ते विकास, भुपृष्ठ विकास, सिंचन, वाहतुक यापेक्षा अधिक उज्वला गॅस, आरोग्य विमा, शेतकरी सन्मान योजना आणि विविध प्रकारच्या गोरगरिबांसाठी सुरक्षा योजना यावर केलेला खर्च यातुन नरेंद्र मोदी सरकारने करून दाखवलेले काम केंद्र सरकार गरिबांसाठी काय करू शकतं? हे केवळ मोदी यांच्या नेतृत्वाखाली कारकीर्दीतच देशवासियांना कळालं. अन्यथा काँग्रेसवाल्यांनी देशाला लुटुन गिळंकृत केलं असं म्हटलं तर चुक ठरणार नाही. मागच्या दहा-पंधरा वर्षापासुन या कर्माच्या पापामुळेच काँग्रेस पक्षाचे वासे फिरले आणि देश काँग्रेसमुक्त झाला. मात्र शाम पित्रोदा सारख्या काँग्रेसी विचाराची मानसिकता ज्यांच्या पोटात अजुनही या देशातील गरिबांच्या विषयी कशा प्रकारे वितुष्ट आहे? त्यांच्याविषयी असणारी निया लक्षात घेण्यासारखी वाटते. खरं तर प्रत्येक





माणसाला जिवंतपणी कर द्यावाच लागतो. पण माणुस मरण पावल्यानंतरही कर लावण्याचा काँग्रेसचा विचार म्हणजे सामान्य जनतेच्या जीवनावर केलेला हल्ला होय. वास्तविक पहाता या देशात मध्यम वर्गीय माणसं अतिशय कष्ट करून जीवन जगतात. एक-एक पैसा जोडून पुंजी जमा करतात. अशा संपत्तीवर काँग्रेसचा डोळा म्हणजे गोरगरिबाला सत्ता आल्यानंतर लुटण्याचा प्रकार असंच म्हणावे लागेल. काँग्रेस पक्षाच्या पोटात कशा प्रकारचं पाप हे सिद्ध करणारं शाम पित्रोदाचं वक्तव्य म्हणावे लागेल. काँग्रेस पक्षाने भलेही त्या वक्तव्याशी संबंध नाही असं म्हणून हात झटकले. कारण पंतप्रधान नरेंद्र मोदींनी या प्रश्नावर जोरदार हल्ला चढवला. एवढेच नाही तर त्यांची नियत उघडी पाडली. पण निवडणुकीत असं बोलणं खरं तर सर्वसामान्य जनता मतदारांनी काँग्रेसपासून सावध रहाण्याची अत्यंत गरज वाटते. माझ्या विधानाचा विपर्यास केला असा खुलासा शाम पित्रोदा यांनी केला असला तरी अमेरिकेचा वारसा करार संदर्भात तिथं जावुन विधान करणं तेही आपल्या देशात निवडणुका सुरू असताना कदाचित जाणिवपुर्वक खेळी असु शकते. एवढेच नव्हे तर मताचं लांगुनचालुन करण्यासाठीही म्हणावे लागेल. वास्तविक पहाता देशात आता काँग्रेसचा जन्म होणार नाही हा भाग वेगळा. पण उद्या केवळ मतांसाठी काँग्रेसवाले मध्यम वर्गीयांच्या संपत्तीचा वाटा मरणानंतर निश्चितच अल्पसंख्यांम समुदायाला देणारा कायदा करायला मागे रहाणार नाहीत. कारण आजवर केवळ मतांसाठी या मंडळीनं वर्षानुवर्षे आयोध्येतील प्रभु रामचंद्र मंदिर बांधकामाचा विषय असेल किंवा काश्मिरमधील ३७० कलम असेल हे विषय जाणिवपुर्वक मागे ठेवले होते. संविधान धोक्यात आलं म्हणुन छाती बदडुन घेणाऱ्या काँग्रेसवाल्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना लोकसभा निवडणुकीत पराभुत केल्याचा इतिहास कधीच पुसुन निघणार नाही. त्याहुन अधिक बोलायचं झालं तर घटना समितीचं अध्यक्ष पद देताना देखील नेहरूसारख्या तत्कालीन नेत्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मानसिक त्रास दिल्याचा इतिहास देखील पुसुन गेलेला नाही. शेवटच्या माणसाच्या कल्याणाची भाषा काँग्रेसवाल्यांनी फक्त तोंडी ठेवली. प्रत्यक्षात मढ्यावरचं लोणी खाण्याचे प्रकार आणि संस्कृती काँग्रेसवाल्यांची असुन केवळ मतांसाठी अशा कराराचा कायदा करायला ही मंडळी मागे रहाणार नाहीत हे नक्कीच. एक शाम पित्रोदा अमेरिकेत जावुन अशी मुलाखत देतो याचाच अर्थ काँग्रेस पक्षाची मुळ भुमिका हीच असुन तशा प्रकारचा पोटात स्वार्थी गोळा आहे. म्हणुनच खऱ्या अर्थाने लोकसभा निवडणुकीकडे सामान्य जनता मतदारांनी डोळे उघडे ठेवुन बघण्याची गरज वाटते. दहा वर्षे संधी नरेंद्र मोदी नेतृत्वाला मिळाली. जगाच्या पाठीवर भारतमातेचा चेहरामोहरा बदलवुन टाकला. आपला देश सर्व शक्तिशाली म्हणुन ओळखला जावु लागला. भारतीय पंतप्रधानाचं वाजतगाजत स्वागत अमेरिका, रशिया, फ्रान्समध्ये होणं नेतृत्वाची ताकद लक्षात येण्यासारखंच होय. चला तर मग, अशा घाणेरड्या काँग्रेसी मानसिकतेला पुन्हा एकदा त्यांची जागा दाखवुन द्या आणि सत्पात्री मतदान करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याच नेतृत्वाला पसंती द्या.



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

# सातत्य टिकवता आले तर अपयश पदरी पडत नाही

आधुनिक केसरी

**यश कोणालाही आंदण मिळतं नाही यशाचा मार्ग सातत्याच्या घाटातून जातो. दैदिप्यमान यश मिळवायचं असेल तर जीवनात काही पथ्य हि पाळावीच लागतात त्याला पर्याय नसतो.आजर बरा होण्यासाठी जसं रूग्णांना काही पथ्य हि  पाळावीच लागतात आणि हिच पथ्य आजार बरा करतात त्याच प्रमाणे आयुष्यात यशाला गवसणी घालण्यासाठी प्रयत्नांच सातत्य टिकवून ठेवणे खुप आवश्यक आहे.अपयश पदरी पडावं हि चुकुन सुद्धा कोणीची आपेक्ष नसते.आपल्या पदारात अपयश पडु देयच नसेल तर आपण आपलं सातत्य टिकवल पाहिजे.यश हे कधीच रातोरात मिळत नाही. त्यासाठी अनेक दिवस मेहनत करावी लागते.पण हिच मेहनत करताना या मध्ये चढ आला तर चालेल पण उतार येता कामा नये.**

म्हणजे प्रमाण पेक्षा जास्त मेहनत घेता आली तर उत्तम अति उत्तम पण प्रमाणा पेक्षा कमी चालणार नाही.महणुन यशाचं गणितं ठरवुन मेहनतीचं प्रमाण निश्चित केलं पाहिजे.प्रमाण ठरवल्या नंतर त्या प्रमाणात कोणत्याही प्रकारचा खंड पडणार नाही याची जाणीव ठेवून मार्गक्रमण करण गरजेचे आहे.प्रयत्नांच यशात रूपांतर होण्यासाठी सातत्य निर्णायक ठरत.निरंतरता हि खुप महत्वाची असते. ज्या क्षेत्रात आपल्याला यश मिळावायच असेल त्या अनुषंगाने तर प्रयत्नांची गरज असतेच पण या प्रयत्नांना सातत्याची जोड मिळाली पाहिजे हि जोड लागली तरच मग अशक्यप्राय असं काहिच उरत नाही.प्रयत्नांची पराकाष्ठा करताना सातत्य जोपासता आल पाहिजे.सातत्य जोपासण म्हणजे जे काही अशक्य दिसतंय वाटतंय त्याला सुद्धा शक्य करण्यात काहीच अडचण निर्माण होत नाही.आपण आपल्या जीवनात जे काही धेय्य बाळगतो पाळते ते धेय्य पुर्ण करण्यासाठी आपला जो संघर्षमय प्रवास असतो. या प्रवासाचा शुभारंभ करताना एक महत्वाची बाब लक्षात ठेवा ती बाब म्हणजे पहिल्या दिवसापासून ते यश पदरात पडत नाही तोपर्यंत प्रयत्नां मध्ये सातत्या खंड पडू देऊ नका मग धेय्य कितीही कठिण असु द्या सातत्या समोर यशाल नतमस्तक व्हावंच लागतं.यशस्वी होण्यासाठी आपण प्रयत्न करतो पण सातत्य ठेवत नाही इथच आपण फसतो.आपल्याला यश पाहिजे आहे पण सातत्य नको आहे हिच आपली सगळ्यात मोठी अडचण आणि दुर्बलता आहे.त्या मुळे आपण केलेली सर्व मेहनत वायाला जाते . यश पदरात पाडून घेण्यासाठी आपण जी राणनिती अखातोय ती रणनिती प्रत्यक्षात उतरवण्यासाठी प्रयत्नात सातत्य राखणं गरजेचं आहे.मार्ग किती खडतर, कठिण, संघर्षमय आहे हे महत्वाचं नसुन आपण त्या दिशेने प्रयत्न करताना आपल्या प्रयत्नाला सातत्याची जोड किती प्रमाणिक आहे हे महत्वाचं आहे हिच प्रामाणिकता आपल्या झोळीत यश टाकते.महणुन यशासाठी प्रयत्नांना सातत्याची जोड अपेक्षित असते.याच मार्गावरील प्रवास कायम ठेवला पाहिजे एक दिवस आपण नक्कीच धेय्य शिखरावर पोहचणार या मध्ये एतकिंचित सुद्धा शंका नाही.जीवनातील अपेक्षा इच्छा महत्वाकांक्षा अथवा धेय्यपूर्ती गाठण्यासाठी मेहनत तर घ्यावीच लागते मेहनतीला पर्याय नाही पण सातत्य हेच निर्णायक ठरत.वेळ प्रसंगी संघर्ष करावा लागतो पण त्याच बरोबर महत्वाची बाब हि हा सर्व प्रवास होत असताना सातत्याचा मार्ग सोडता कामा नये.सातत्याच्या मार्ग वरूनच यशोशिखरावर गाठता येत.जीवन म्हटलं कि अस्तित्व आलं प्रत्येक व्यक्ती आपल्या जीवनात एक अथवा अनेक वेगवेगळ्या क्षेत्रात आपलं स्वतःचं नावलौकिक अथवा अस्तित्व निर्माण होण्यासाठी प्रयत्नशील असतो.विद्यार्थी दशेत अनेक विद्यार्थी वेगवेगळ्या पद्धतीने आपल्या उज्वल भविष्यासाठी संधीच्या शोधात असतात हिच संधी शोधताना संधी पदरात पडण्यासाठीचा जो काही संघर्ष आहे त्या संघर्षाचं सोन होण्यासाठी सातत्य हेच निर्णायक महत्वपूर्ण ठरत.आपण प्रयत्न करतो हे अगदी खरे आहे पण सातत्य ठेवत नाही हे पण तितकेच खरे आहे.मग आपला यश मार्ग सुखकर कसा होईल यश मार्ग सुखकर होण्यासाठी घाई गडबड करून चालत नाही. तर दैनंदिन नित्य दिनक्रमा नुसार नियोजनबद्ध पद्धतीने प्रयत्नांच सातत्य आचरणात आणायला हवा . जेणेकरून प्रयत्नात खंड पडणार नाही हिच दक्षाता घेणं गरजेचं आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं  ए -३२,  छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०.  (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore *   Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar  414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# लता दीदी म्हणजेच संगीत आणि संगीत म्हणजेच लता दीदी

## अमिताभ बच्चन यांना लता मंगेशकर स्मृती जीवन गौरव पुरस्कार प्रदान

आधुनिक केसरी न्यूज

**भगवान राऊत**

**अहमदनगर :** लतादीदी म्हणजेच संगीत आणि संगीत म्हणजेच लता दीदी. लता दिदी संगीत क्षेत्रातील साक्षात सरस्वती देवी होत्या. अशा शब्दात प्रसिद्ध अभिनेते आणि अभिनय क्षेत्रातील शहेनशहा बिग बी अमिताभ बच्चन यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.




प्रसिद्ध अभिनेते अमिताभ बच्चन यांना यंदाचा स्वर्गीय लता दीनानाथ मंगेशकर स्मृती जीवनगौरव पुरस्कार प्रसिद्ध गायिका उषा मंगेशकर यांच्या हस्ते सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला.

मास्टर दीनानाथ मंगेशकर स्मृती प्रतिष्ठान, हृदयेश आर्ट्स व म्युझिक मुड्सच्या संयुक्त विद्यमाने विलेपार्ले येथील दीनानाथ मंगेशकर नाट्यगृहात रविवार दि. २४ एप्रिल एप्रिल रोजी सायंकाळी ६ वा. पार पडलेल्या ८२ व्या मास्टर दिनानाथ मंगेशकर स्मृती सोहळ्यास पंडित हृदयनाथ मंगेशकर, गायिका उषा मंगेशकर, अमिताभ बच्चन, अभिषेक बच्चन, पद्मिनी कोल्हापुरे, संगीतकार ए. आर. रहमान, प्रसिद्ध गायक रूपकुमार राठोड, अभिनेता रणदीप हुडा, अशोक सराफ, चिन्मय मांडलेकर, अतुल परचुरे, ज्येष्ठ पत्रकार भाऊ तोरसेकर, सामाजिक कार्यकर्ते यजुर्वेंद्र महाजन, मंजिरी फडके आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

लता मंगेशकर यांच्या कुटुंबाचे प्रेम गेली अनेक वर्षे बच्चन कुटुंबावर आहे. लता मंगेशकर यांनीच मला १९८१ साली न्यूयॉर्क येथे झालेल्या त्यांच्या विशेष कार्यक्रमांमध्ये मला माझ्याच चित्रपटातील मी गायलेले मेरे अंगने में तुम्हारा क्या काम है हे गाणे गाण्याची संधी दिली. आणि तेव्हापासून भारतातील चित्रपट क्षेत्रातील कलाकारांना परदेशात स्टेज शो सादर करण्याची संधी मिळाली. लता मंगेशकर म्हणजे शहद की धार है अशा शब्दात माझे वडील हरिवंश राय बच्चन त्यांचे वर्णन करायचे. कारण लता मंगेशकर यांचा स्वर हा आत्म्याला परमात्म्याशी जोडणारी एक तार आहे. त्यांचा आवाज ऐकल्यानंतर आत्म्याला परमात्म्याशी जोडले जाते. याची जाणीव ऐकणाऱ्याला नक्की होते. लता मंगेशकर म्हणजे मधाची धार कारण मधाची धार ही सतत प्रवाही असते. ती कधीही तुटत नाही. त्याचप्रमाणे लता मंगेशकर यांचा सुरही कधी तुटत नाही. असे सांगताना लता मंगेशकर यांच्यावर रचलेली आकाशाची सावली ही कविता देखील त्यांनी सादर केली. आपल्या या कवितेत ते म्हणतात, रणरणत्या उन्हात आकाशाची सावली मला लाभली. त्या आकाशाचे नाव लता मंगेशकर. माझ्या कवितेत लतादीदींचे स्वर संगीताचा परिचय होता. हीच संगीताची परिभाषा आणि संगीताची व्याख्या होती. लतादीदी म्हणजेच संगीत आणि संगीत म्हणजेच लतादीदी. माझ्या कवितेला समानार्थी शब्द आहेत. दोन्ही गोष्टी या शब्दांमध्ये ज्येष्ठ अभिनेते अमिताभ बच्चन यांनी आपल्या भावना व्यक्त करताच नाट्यगृहामध्ये टाळ्यांची प्रचंड बरसात झाली. यावेळी प्रदीर्घ संगीत सेवेसाठी संगीतकार ए. आर. रहमान, उत्कृष्ट चित्रपट निर्मितीसाठी निर्माते, दिग्दर्शक, अभिनेते रणदीप हुडा, चित्रपट क्षेत्रातील प्रदीर्घ कारकिर्दीसाठी अभिनेत्री पद्मिनी कोल्हापुरे, गझल गायक रूपकुमार राठोड, पत्रकार भाऊ तोरसेकर, अभिनेते अशोक सराफ यांना मास्टर दीनानाथ मंगेशकर स्मृती पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सिने नाट्य अभिनेते अतुल परचुरे, यांचा यावेळेस विशेष गौरव करण्यात आला. अभिनेता दिग्दर्शक चिन्मय मांडलेकर यांना मोहन वाघ स्मृती गौरव पुरस्कार तर दिप स्तंभ फाऊंडेशनचे संचालक यजूर्वेंद्र महाजन यांना सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी बद्दल तर मंजिरी फडके यांना साहित्य सेवेतील उल्लेखनीय कामगिरी बद्दल पुरस्कार वितरण करण्यात आले. पुरस्कार वितरण समारंभानंतर गायिका विभावरी आपटे जोशी यांनी 'श्री शारदा विश्व मोहिनी लतादीदी' या कार्यक्रमाच्या माध्यमातून लता मंगेशकर यांना सांगेतिक मानवंदना अर्पण केली. मास्टर दिनानाथ मंगेशकर यांच्या निधनानंतर केवळ १३ वर्षाच्या असलेल्या लतादीदींनी १९४३ साली मास्टर दिनानाथ मंगेशकर यांची १ ली पुण्यतिथी साजरी केली. त्यावेळी केशरबाई केळकर यांचे गायन झाले होते. त्यानंतर सलग ४० वर्षे लतादीदींनी मास्टर दिनानाथ मंगेशकर यांची पुण्यतिथी साजरी केली. त्यांच्या निधनानंतर मंगेशकर परिवार हा पुरस्कार वितरण सोहळा साजरा करीत आहे. ज्येष्ठ अभिनेते अमिताभ बच्चन यांनी आतापर्यंत ३ कार्यक्रमांना हजेरी लावली आहे. अशा शब्दात पंडित हृदयनाथ मंगेशकर यांनी प्रास्ताविक पर मनोगत व्यक्त केले. सुप्रसिद्ध निवेदक सूत्रसंचालक हरीश भिमानी यांनी या कार्यक्रमाचे अत्यंत खुमासदार शैलीत सूत्रसंचालन केले. आदिनाथ मंगेशकर यांनी आभार मानले.

या कार्यक्रमास अभिनेते पुष्कर श्रोत्री, अभिनेत्री निवेदिता जोशी सराफ, नृत्यदिग्दर्शिका सोनिया परचूरे यांच्यासह चित्रपट, नाट्य, संगीत, साहित्य, पत्रकारिता व सामाजिक कार्यक्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

# पत्रकार संतोष भुतेकर यांना शिवीगाळ करून धमकी दिल्या प्रकरणी पोलिसांत तक्रार

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**सोयगाव :** जालना लोकसभेचे भाजपाचे उमेदवार



रावसाहेब दानवे यांच्या विरोधात बातमी का छापतो असे म्हणुन, आता जर बातमी छापलीस तर तुला घरी येवुन दाखवतोच अशी धम की 'दैनिक जगमित्र'चे संपादक संतोष भुतेकर यांना देवुन शिवराळ भाषेत आई-वडीलांवर शिवीगाळ केल्या प्रकरणी सोमनाथ जळगांव येथील शिवाजी गायकवाड या आरोपी विरुध्द चंदनझिरा पोलीस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, या प्रकरणी पत्रकार संरक्षण कायदा तसेच मारहाणीच्या धमक्या दिल्या प्रकरणी योग्य गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात येणार आहे. याविषयी अधिक माहिती अशी की, उमेदवार दानवे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर आयोजित भाजपा नेते बावनकुळे यांच्या प्रचार सभेत असलेल्या रिकाम्या खुर्च्यांची छायाचित्रे आणि सविस्तर बातमी गुरूवारी दि. २५ एप्रिलच्या अंकात प्रकाशित केल्याबद्दल सोमनाथ जळगांव येथील शिवाजी जगन्नाथ गायकवाड यांनी पत्रकार श्री भुतेकर यांना उमेदवार दानवे यांच्या विरोधात यापुढे बातमी छापू नकोस. जर छापलीस तर तुझ्या घरी येवुन दाखवतो असे म्हणुन धमक्या देत शिवीगाळ केल्या प्रकरणी भुतेकर यांना चंदनझिरा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. दरम्यान, पोलीसांनी अदखलपात्र गुन्हा दाखल केला असून प्रकरणाचा तपास अमंलदार देशमुख करत असल्याची माहीती ठाणे अमंलदार संजय गवई यांनी दिली.

या संदर्भात पत्रकार संघटनेचे नेते ज्येष्ठ पत्रकार अंकुशराव देशमुख यांच्या उपस्थितीत झालेल्या तातडीच्या बैठकीत प्रकरणाचा तीव्र निषेध करण्यात आला.

निवडणुकांच्या तोंडावर एका राष्ट्रीय 'प्रभावी पक्षाच्या आणि नेत्यांच्या' कार्यकर्त्यांनी प्रसिध्द झालेल्या बातम्यांच्या अनुषंगाने संबंधीत वृत्तपत्राच्या संपादकांना मोबाईलवर अर्वाच्च शब्दात शिविगाळ करीत संपादकांच्या माता-पित्यांचा उध्दार करणे अत्यंत नीच पातळीचे असल्याचा सुरही व्यक्त करण्यात आला. शिवाय या संदर्भात आरोपीविरूध्द पोलीसांनी पत्रकार संरक्षण कायदा आणि योग्य कलमान्वये गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करावी अशा मागणीसाठी शुक्रवारी ता. २६ सकाळी जिल्हाधिकारी आणि पोलीस अधिक्षकांची भेट घेण्याचा निर्णय घेण्यात आला. यावेळी देशमुख यांच्यासह व्हॉईस ऑफ मिडिया या पत्रकारांच्या संघटनेचे पदाधिकारी अविनाश कव्हळे, राजेश भालेराव, दैनिक सामनाचे विजय कोठोडे, ज्येष्ठ पत्रकार मकरंद जहागीरदार, अहेमद नूर, सदानंद देशमुख आणि अन्य उपस्थित होते.



# उन्हापासून संरक्षण; ५०० टोप्यांचे वाटप लोणंद येथे एक अनोखा उपक्रम हाती

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** राज्यात कडाक्याचा उन्हाळा हा चांगलाच जाणवू लागला आहे.त्यामुळे घराच्या बाहेर पडणे मुश्कील झालेले आहे.दुपारच्या वेळेत वयोवृद्ध असतील किंवा चिमुकले असतील ते घरातच थांबून दिवस कसा तरी घालवित आहेत. संध्याकाळच्या वेळेत सावली आल्यानंतर कुठेतरी फेर फटका मारण्यासाठी बाहेर पडत असतात. परंतू ज्यांना घराच्या बाहेर पडल्याशिवाय गत्यंतरच नाही. अशांना मात्र कडक उन्हाचा हा सामना हा करावाच लागत आहे.व्यवसायिक असो किंवा कर्मचारी वर्ग असो अशांना कडक उन्हाळा बघून घरांत तर बसता येणार नाही.अशा लोकांचे कडक उन्हापासून संरक्षण व्हावे.म्हणून लोणंद ता.खंडाळा येथे टोप्या वाटप करणाऱ्या एका अनोख्या उपक्रमास हाती घेण्यात आले.या उपक्रमातून एकुण ५०० लोकांपर्यंत टोप्या वाटप करण्याचे कार्य करण्यात आलेले आहे.त्यामुळे अशा या उपक्रमाचे कौतुक लोणंद शहरात होऊ लागलेले आहे. हा उपक्रम लोणंद फेस्टिव्हल,वु मन बाईक रॅली आणि राजयोग पेंट यांच्या वतीने घेण्यात आला होता. समाजातील घटकांच्या आरोग्याची विशेष काळजी घेणारा हा उपक्रम जणू आरोग्य दायी ठरला. सामाजिक बांधिलकीची जाण ठेवून लोणंद शहरात नेहमीच चांगले आणि समाज हिताचे उपक्रम होत असतात. नागरीकांचे उन्हापासून संरक्षण व्हावे म्हणून टोप्यांचे वाटप करण्यात आल्याने हा उपक्रमच खऱ्या अर्थाने लोकांच्या जीवाची विशेष काळजी करणारा ठरला असुन लोकांनीसुद्धा या उपक्रमाचे विशेष कौतुक केले. लोणंदच्या बाजार स्थळ परिसरात मोठया प्रमाणात व्यवसायिक लोकं आढळून येतात. तसेच गुरुवार हा दिवस लोणंद चा आठवडी बाजार असल्याने सर्वच शेतकरी वर्ग आणि व्यापारी आणि विक्रेते हे बाजार तळावर मोठ्या संख्येने दिसून येत असतात. ह्या सर्वांपर्यंत मोफत टोप्या या उपक्रमातून माध्यमातून पोहचविण्यात आल्या. कष्टकरी वर्गाच्या डोक्यावर एक मायेचा आधार देणारी व उन्हापासून संरक्षण देणारी टोपी देता आल्याने तसेच एक समाज हिताचे चांगले कार्य करता आल्याने या उपक्रमाच्या आयोजकांनी विशेष समाधान व्यक्त केले. बाजार तळावरील लोकांनी आयोजकांचे आभार सुद्धा मानले. तसेच नगरपंचायत सफाई कर्मचारी,गवंडी कामगार, प्लंबर व बाजार करणारे यांना सुद्धा टोप्या देण्यात आल्या. टोप्या वाटप करतेवेळी प्राजित परदेशी, संतोष खरात, शैलजा खरात, रजनी शिंदे, अजित गवळी, योगेश परदेशी, वैशाली गवळी, पायल पालेसा, ओंकार आहेर, वरुण क्षीरसागर, दत्ता रासकर, ओंकार परदेशी, मयूर जंगम, पुजा गाडे, पुजा जंगम, सुनिता गाडे, सुषमा शहा, सविता शिंदे आदी उपस्थित होते. या सर्वांकडून टोप्यांचे वाटप करण्यात आले. येत्या काही दिवसांत पाचशे टोप्यांचे वाटप पुन्हा एकदा करण्यात येणार आहे, असे सुद्धा सांगण्यात आलेले आहे.

# बेताल वक्तव्ये करणाऱ्या राहुल गांधींना मतदार धडा शिकवतील : केशव उपाध्ये

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** सोलापूरच्या सभेत पंतप्रधानमोदी यांचा एकेरी व अवमानकारक उल्लेख करून काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी



त्यांची संस्कृती दाखवून दिली आहे. त्यांनी केवळ नरेंद्र मोदी यांचा नव्हे, तर देशाच्या सर्वोच्च सांविधानिक पदावरील व्यक्तीचा अपमान केला असून पराभवाच्या भीतीने वैफल्य आल्यामुळे त्यांचा जिभेवरील ताबा सुटल्याचे स्पष्ट झाले आहे. येत्या लोकसभा निवडणुकीत अशा असभ्य व उर्मट नेत्यांना व त्यांच्या पक्षाला जनता त्यांची जागा दाखवून देईल असे भारतीय जनता पार्टीचे प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी शुक्रवारी भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत सांगितले. यावेळी माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन, प्रवक्ते पंकज मोदी उपस्थित होते. सोलापूरच्या सभेत राहुल गांधी यांनी पंतप्रधान मोदी यांचा सातत्याने एकेरी उल्लेख केला. त्यांचे हे वक्तव्य आणि वर्तन राजकीय संस्कृतीला शोभणारे नसून केवळ वैफल्य व अपरिपक्वपणा दर्शविणारे आहे. लोकसभा निवडणुकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपाच्या नेतृत्वाखालील 'एनडीए'ला प्रचंड जनाधार मिळत असून 400 पेक्षा अधिक जागांवरील भाजपा आघाडीचा विजय निश्चित झाल्याने काँग्रेस व इंडी आघाडीला वैफल्य आले आहे. राहुल गांधी यांच्या भाषणात याआधीही सुसंस्कृतपणा आणि अभ्यासाचा अभावच होता. आता तर त्यांच्याकडे मुद्दे नाहीत, उमेदवारही नाहीत आणि निवडणूक लढविण्याची उमेदही राहिलेली नाही. त्यातच, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसच्या जाहीरनाम्याचा पंचनामा करून जनतेची संपत्ती हिरावून घेण्याचा कट उघड केल्यामुळे काँग्रेसची भंबेरी उडाली आहे. काँग्रेस व इंडी आघाडीकडे मुद्दे नाहीत, विकासाच्या मुद्द्यावर भूमिका नाही आणि भाजपा आघाडी सरकारच्या कामांशी बरोबरीदेखील करता येत नसल्याने, अशी वेळ येते तेव्हा काँग्रेसचे नेते आपल्याला शिव्याशाप देतात असे पंतप्रधान मोदी यांनी वारंवार म्हटले होते. रा

# बावधनमध्ये डिन्स रेसिडेन्सीत वेश्याव्यवसाय

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** बावधनमध्ये डिन्स रेसिडेन्सीतील फ्लॅट क्रमांक ३०२ मध्ये सुरू असलेल्या वेश्याव्यवसायाचा पिंपरी- चिंचवडच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक विभागाने पर्दाफाश केला आहे. जास्त पैशांचे अमिश दाखवून आरोपी सूर्यकांत पंडित देवरे तीन तरुणींकडून वेश्याव्यवसाय करून घेत होता. पोलिसांनी तिन्ही तरुणींची सुटका केली आहे. आरोपी सूर्यकांत देवरे ला पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक देवेंद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

# काँग्रेसला ओबीसीचे आरक्षण मुस्लिम समाजाला द्यायचे आहे

## पंतप्रधान मोदी यांचा शाहजहानपूर येथे आयोजित शंखनाद महासभेत आरोप

आधुनिक केसरी न्यूज



**शाहजहानपूर :** विरोधकांच्या तुष्टीकरणाच्या राजकारणाने देश तुकड्या -तुकड्यात विभागला गेला असून प्रामाणिक लोकांच्या हक्कांवर गदा आणली गेली आहे. भाजपचा मार्ग तुष्टीकरणाचा नसून सर्वांच्या कल्याणाचा आहे, तर काँग्रेसची इंडी आघाडी खोलवर तुष्टीकरणात गुंतलेली आहे. काँग्रेसने जारी केलेला जाहीरनामा विशिष्ट समाजाची मतपेढी जपण्यासाठी समर्पित असून त्यावर 100 टक्के मुस्लिम लीगचा प्रभाव दिसून येतो, अशा परखड शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज काँग्रेसवर नवा हल्ला चढविला.
उत्तर प्रदेशातील आग्रा, आंवला आणि शाहजहानपूर येथे आयोजित केलेल्या विशाल विजय संकल्प शंखनाद महासभांमध्ये बोलताना पंतप्रधान मोदी यांनी उत्तर प्रदेशातील जनतेला सपा आणि काँग्रेसच्या वारसा कर आणि एक्स-रे योजनेची माहिती दिली. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री श्री. योगी आदित्यनाथ, उत्तर प्रदेश भाजप प्रदेशाध्यक्ष श्री. भूपेंद्र चौधरी, केंद्रीय राज्यमंत्री आणि आग्रा लोकसभा उमेदवार श्री. एस.पी. सिंह बघेल, फतेहपूर सिक्री लोकसभा उमेदवार श्री. राजकुमार चहर, आंवला लोकसभा उमेदवार श्री. धर्मेंद्र कश्यप आणि राज्य सरकारमधील मंत्री श्रीमती बेबी रानी मौर्य यांच्यासहइतर पदाधिकारी याप्रसंगी मंचावर उपस्थित होते.
भाजपचे संकल्प पत्र देश मजबूत करण्याच्या संकल्पाशी समर्पित असून पाया जितका मजबूत तितके घर मजबूत, या विचाराने भाजप गरीब, शेतकरी, तरुण आणि महिला शक्ती यांना "विकसित भारता"साठी सक्षम करत आहे, असे ते म्हणाले.
भारतात धर्माच्या आधारावर आरक्षण कधीच दिले जाणार नाही हे स्वातंत्र्य मिळाल्यापासूनच स्पष्ट झाले होते. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या इच्छेनुसार संविधानाचा आणि सामाजिक न्यायाचा तो गाभा आहे. पण काँग्रेस हा असा पक्ष आहे, जो बाबासाहेबांचा, संविधानाचा आणि सामाजिक न्यायाचा अपमान करत आहे. काँग्रेसने कधी कर्नाटकात, कधी आंध्र प्रदेशात आणि कधी आपल्या जाहीरनाम्यात अनेक वेळा धर्माच्या आधारावर आरक्षणाचा पुरस्कार केला आहे.
देशाच्या संविधानाने आणि देशाच्या न्यायालयांनी काँग्रेसला हे करण्यापासून वारंवार मनाई केली आहे. देशाच्या न्यायव्यवस्थेने नेहमीच काँग्रेसची प्रत्येक गोष्ट फेटाळून लावली, त्यामुळे काँग्रेसने आता मागच्या दाराने एक खेळ खेळायला सुरुवात केली आहे, ज्यातून एससी, एसटी आणि ओबीसींच्या डोळ्यात धूळफेक करण्याच प्रयत्न केला जात आहे. काँग्रेसने आता धर्माच्या आधारावर आरक्षण देण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी काँग्रेसने ओबीसींच्या 27 टक्के आरक्षणातील काही हिस्सा हिसकावून धर्माच्या आधारे आरक्षण देण्याची योजना आखली आहे. कर्नाटकच्या काँग्रेस सरकारने रातोरात कागदावर शिक्का मारून राज्यातील मुस्लिम समाजाला ओबीसी बनवून 27 टक्के आरक्षणात समाविष्ट केले. काँग्रेसने ओबीसी वर्गाच्या हक्कांवर डल्ला मारला आहे. तोच खेळ यूपीमध्ये खेळण्याचा काँग्रेसचा मानस असून यावेळी त्यांना समाजवादी पक्षाचा पूर्ण पाठिंबा मिळत आहे.
2012 मध्ये, उत्तर प्रदेश विधानसभेच्या आधी, काँग्रेसप्रणित यूपीए सरकारने असाच प्रयत्न केला होता. काँग्रेसने धर्माच्या आधारावर अल्पसंख्याकांना ओबीसी आरक्षणाचा एक भाग देण्याचा निर्णय घेतला होता, परंतु नंतर त्यांच्या हेतूत यशस्वी झाले नाहीत. काँग्रेस आणि सपाची ही घातक खेळी उत्तर प्रदेशातील जनतेला आणि ओबीसी समाजाला समजून घ्यावी लागेल. भारतीय राज्यघटनेनुसार उत्तर प्रदेशातील अनेक ओबीसी जातींना आरक्षणाचा अधिकार आहे, पण काँग्रेस आणि सपा त्यांच्याकडून हा अधिकार हिसकावून त्यांच्या आवडत्या व्होट बँकेला द्यायचा आहे. आपल्या व्होटबँकेसाठी सपा यादव आणि मागासवर्गीयांचा सर्वात मोठा विश्वासघात करत आहे. तुष्टीकरणात बुडलेल्या समाजवादी पक्ष आणि काँग्रेस या दोघांची विचारसरणी सारखीच आहे. उत्तर प्रदेशातील काँग्रेस आणि सपाच्या दोन मुलांमधील मैत्रीचा आधारही तुष्टीकरणाचे राजकारण आहे. ही दोन्ही मुलं आपल्या भाषणात ओबीसी-ओबीसी करतात, पण मागच्या दाराने ओबीसींचे हक्क हिसकावून त्यांची व्होट बँक मजबूत करण्याचे काम करतात, अशी टीका पंतप्रधानांनी केली. काँग्रेस पक्षाचे एक वैशिष्टय असे आहे की, जेव्हा त्यांना कोणतेही मोठे दुष्कृत्य करावे लागते, तेव्हा ते देशाच्या आणि संविधानाच्या नावाने आवाज उठवू लागतात. 70 च्या दशकात काँग्रेसने अशाच प्रकारच्या घोषणा देत देशात आणीबाणी लागू केली होती. केवळ आर्थिकच नव्हे, तर संस्थांच्या कार्यालयांचे सर्वेक्षण करण्याचा काँग्रेसचा मानस आहे. म्हणजे एका मागास-दलित कुटुंबात दोन माणसे नोकरी करत असतील, तर एक नोकरी हिसकावून ज्यांचा देशाच्या साधन संपत्तीवर पहिला हक्क आहे, त्यांना ती देण्याचा डाव आहे, पण जोपर्यंत मोदी जिवंत आहेत, तोपर्यंत देशात असा अन्याय होऊ देणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली. एससी, एसटी आणि ओबीसींचे हक्क आणि महिलांचे स्त्रीधन आणि मंगळसूत्र पाहण्याआधी इंडी आघाडीला मोदींशी सामना करावा लागेल.
भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाई केली जाईल आणि लुटलेला पैसा गरिबांना परत दिला जाईल, असा भाजपचा संकल्प आहे. भ्रष्टाचाऱ्यांकडून जप्त केलेला पैसा, बंगले आणि गाड्या जनतेत कशा वाटायच्या यावर मोदी वेगाने काम करत आहेत. इंडी आघाडीचे नेते माता-भगिनींच्या स्त्रीधनावर लक्ष ठेवून आहेत, पण माता-भगिनींना मालमत्तेचे हक्कदार बनवण्यासाठी मोदी चौकीदार म्हणून उभे आहेत. येत्या 5 वर्षात देशातील स्त्री शक्तीचे जीवन अधिक सशक्त होणार आहे, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

# सलबतपूर येथून वीस वर्षीय महिला बेपत्ता

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** तालुक्यातील सलबतपूर येथून भाग्यश्री अक्षय भोसले ही वीस वर्षीय विवाहीत महिला बेपत्ता झाली असल्याची तक्रार विवाहित महिलेची सासू वैशाली डीचन भोसले यांनी नेवासा पोलिसांकडे केली असून पोलिसांनी मिसिंग झाल्याची केस दाखल केली आहे.

नेवासा पोलीस स्टेशनला दिलेल्या तक्रारी अर्जात वैशाली भोसले यांनी म्हटले आहे की दि.१९ एप्रिल रोजी रात्री माझी सून भाग्यश्री व मुलगा अक्षय हे दोघे घराबाहेर झोपले होते व मी घरात झोपले होते दि.२० एप्रिल मध्यरात्री १ वाजण्याच्या सुमारास एका फोनवरून मला फोन आला की मी भाग्यश्री बोलते मी घर सोडून जात आहे,माझी वाट पाहू नका असे म्हणून तिने फोन बंद केला
भाग्यश्री अक्षय भोसले वय २०, रंगाने काळी सावळी, उंची दोन फूट दोन इंच, गळ्यात मंगळसूत्र, पायात चांदीचे चाळ, अंगावर लाल रंगाची सहा वारी साडी, कानात कर्णफुले असे वर्णन केले आहे. वैशाली भोसले यांनी नेवासा पोलीस स्टेशनला दिलेल्या तक्रारी अर्जावरून पोलिसांनी ४१/२०२४ नुसार मिसिंग दाखल केली आहे. पुढील तपास पोलीस करत आहे.



# महाविकास आघाडीला भक्कम करण्यासाठी साथ द्या : शिवसेना नेते चंद्रकांत खैरे

## भीमशक्तीचे कार्यकर्ते जोमाने काम करणार असल्याचा निर्धार

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** भिमशक्तीचे अध्यक्ष खासदार चंद्रकांत हंडोरे यांनी महाविकास आघाडीला सदैव सहकार्य केले आहे. कॉंग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेना आदीमित्र पक्षाला भिमशक्तिने सहकार्यची भुमीका घेतली आहे. महाविकास आघाडीला भक्कमपणे साथ द्या असे आवाहन महाविकास आघाडीचे छत्रपती संभाजीनगर चे उमेदवार चंद्रकांत खैरे यांनी केले.
या वेळी भिमशक्ती जोमाने काम करणार असल्याचा निर्धार भिमशक्ती पदाधिकार्यानी मेळाव्यात केले.
यावेळी माजी महापौर नंदकुमार घोडेले, उपजिल्हाप्रमुख राजेंद्र आदमाने पाटील, भिमशक्तीचे मराठवाडा अध्यक्ष संतोष भिंगारे, शांतीलाल गायकवाड, शहर अध्यक्ष - सतिश नरोडे, मराठवाडा सरचटणीस मधुकर नगराळे, जिल्हाअध्यक्ष विनोद कोरके, अनिल मगरे, संजय सातपूते, महिला मराठवाडा अध्यक्ष, प्रिती जाधव, प्रियंका दाभाडे, संजय झिने, पंपू कांबळे, संजय शेजुळ, संजय डोगरदिवे, संजय खोतकर आदिसह नागरीक मोठया संख्येने उपस्थित होते.




# मनपा शाळेत शाळा पूर्वतयारी मेळावा; आयुक्तांच्या हस्ते समर कॅम्पचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** महाराष्ट्र शासनाच्या प्राथमिक शालेय शिक्षण विभागाच्या वतीने राज्यभर २०२४-२५ या शैक्षणिक वर्षी पहिलीत दाखल होणाऱ्या मुलांसाठी शाळा पूर्वतयारी प्रशिक्षण मेळाव्याचे आयोजन करण्यात येत आहे. त्यानुसार चंद्रपूर महानगरपालिकेच्या पीएम श्री सावित्रीबाई फुले सेमी इंग्रजी उच्च प्राथमिक व माध्यमिक शाळा येथे इयत्ता १ ली साठी दाखलपात्र विद्यार्थ्यांचा 'शाळा पूर्वतयारी मेळावा क्र.१ उत्साहात पार पडला सोबतच समर कॅम्पचे उद्घाटन सुद्धा आयुक्त विपीन पालीवाल यांच्या हस्ते करण्यात आले.
आयुक्त विपीन पालीवाल यांनी विद्यार्थी व पालकांशी संवाद साधत आपले मनोगत व्यक्त केले.महानगरपालिका शाळेत शिक्षणारा विद्यार्थी हा सामान्य कुंटूबातील अवश्य आहे मात्र मनपा शाळेत प्रवेश केल्यावर त्याला आपण उत्कृष्ट शाळेत शिकणार आहो अशी भावना निर्माण व्हावी हा मनपा प्रशासनाचा उद्देश आहे.या उद्देशपुर्तीसाठी शाळांमध्ये अधिकाधिक भौतिक सुविधा कश्या उपलब्ध करून देता येईल यादृष्टीने प्रयत्न करण्यात येत आहेत. शाळांच्या वर्ग खोल्यांच्या आधुनिकीकरणाचे काम लवकर पूर्ण करून शाळेचे विविध कार्यक्रम घेणयासाठी एक उत्तम दर्जाचे सभागृह बांधकाम करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.
याप्रसंगी इयत्ता पहिली दाखल पात्र विद्यार्थ्यांची बँड पथकासह रॅली काढण्यात येऊन सात स्टॉल वरून त्यांच्या विविध क्षमता तपासल्या गेल्या.उपस्थीत सर्वांनी समर कॅम्प मधील विविध खेळांचा आस्वाद घेतला, तसेच विशेष शाळा पूर्वतयारी सेल्फी पॉईंटचा आनंद घेतला. सर्व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैशाली बोढाले व आभार प्रदर्शन स्नेहा कुरतोटावार यांनी केले. याप्रसंगी मुख्याध्यापक नागेश नीत, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष कुंदा बावणे,राधा चिंचोलकर, इतर सदस्य, सर्व शिक्षक, विद्यार्थी व पालकगण उपस्थित होते.



**महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार चंद्रकांत खैरे यांच्या प्रचारानिमित्त आविष्कार कॉलनीत वॉर्ड क्र. ६३ येथे डोअर टू डोअर प्रचार करण्यात आला. अविष्कार कॉलनी येथील कर्णेश्वर महादेव मंदिर येथून सुरुवात केली. यावेळी शिवसेना महिला आघाडीच्या उपजिल्हासंघटक जयश्री लुंगारे, युवतीसेना जिल्हा युवती अधिकारी सानिका देवराज, उपशहर ॲड. अंजना गवई, शोभा साबळे, उपविभागसंघटक मनिषा बिरासदर, शाखा संघटिका छाया देवराज, गटप्रमुख लीला पाटील, तसेच शिवसेना शहरप्रमुख विश्वनाथ स्वामी, उपजिल्हाप्रमुख अँड चंद्रकांत गवई, शिवा आप्पा लुंगारे, शाखाप्रमुख शिवकुमार, अर्जुन बरवल आदींची उपस्थिती होती.**

# प.म.प्रांतात १५० गावात भूमी सुपोषण-संरक्षण अभियानाचा संकल्प

आधुनिक केसरी न्यूज



**पुणे :** गेल्या दोनशे वर्षांतील जमिनीबद्दलचा दृष्टिकोन बदलला असून जमीन केवळ आर्थिक संसाधन मानली गेली आहे.जास्तीत जास्त उत्पादन हे उद्दिष्ट बनत असून त्यामुळे पृथ्वीमातेचे शोषण सुरू आहे.सध्या आपल्या जमिनीची स्थिती चिंताजनक आहे. आज देशात ९६.४० दशलक्ष हेक्टर जमीन आहे. त्यातील आपल्या एकूण भौगोलिक क्षेत्राच्या जवळपास ३० टक्के क्षेत्र नापीक आहे. हे चित्र सुधारण्यासाठी अक्षय कृषी परिवाराच्या वतीने पश्चिम महाराष्ट्र प्रांतात १५० गावांमध्ये पुढील महिन्यात भूमी सुपोषणासाठी भूमीचे पूजन आणि व्यापक जनजागृती अभियान राबविण्यात येणार आहे अशी माहिती कृषीभूषण जगन्नाथ मगर यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी गोसेवा गतीविधी प.महाराष्ट्र प्रांत गो-आधारीत शेती सहप्रमुख पूनमताई  राऊत उपस्थित होत्या.

ते पुढे म्हणाले की,भारतातील शेतजमिनीची घटती कार्बन पातळी वाचविण्यासाठी आणि जमीन नापीक होत चालली आहे, यासाठी देशातील विविध प्रमुख संस्थांनी एकत्र येऊन भूमी सुपोषणासाठी विशेष मोहीम हाती घेतली आहे. त्यात भारतातील हजारो गावांमध्ये भूमिपूजन कार्यक्रमाद्वारे मृदा पोषण आणि संवर्धन कार्याला चालना देण्यात आली आहे.2021 पासून जमीन पोषण आणि संवर्धनासाठी राष्ट्रीय स्तरावरील सार्वजनिक मोहीम सुरू केली होती. या सार्वजनिक मोहिमेत कृषी आणि पर्यावरण क्षेत्रात काम करणाऱ्या सामाजिक आणि धार्मिक संस्थांच्या सामूहिक प्रयत्नातून भारतातील हजारो गावांमध्ये भूमिपूजन कार्यक्रमाद्वारे मृदा पोषण आणि संवर्धन कार्याला चालना देण्यात आली आहे. सध्या सर्वत्र उपलब्ध पाणीसाठा दिवसेंदिवस कमी कमी होत चालला असून पुढील पाच वर्षात आपण नैसर्गिक शेती करण्याचा मार्ग स्वीकारला नाही तर पाणी उपलब्धतेची समस्या अजून गंभीर बनेल. असेही ते म्हणाले. त्यामुळे मोठ्या प्रमाणात शेतकरी जमिनीबाबत जागरूक होऊन रसायनमुक्त शेतीकडे वळणे आवश्यक आहे.शेतजमिनीचे भौतिक, रासायनिक आणि जैविक संतुलन बिघडत असून, जमिनीतील वाढत्या प्रदूषणामुळे पुढील काही वर्षांत उत्पादनावर विपरीत परिणाम होणार असल्याची चिंता कृषी आणि पर्यावरण क्षेत्रातील शास्त्रज्ञांनी अनेकदा व्यक्त केली आहे. संकटाच्या रूपाने उत्पादनावर विपरीत परिणाम होईल. जमिनीतील सेंद्रिय कार्बन किमान आवश्यकतेपेक्षा खूप खाली घसरला आहे. त्यामुळे देशाच्या हितासाठी आणि शेतकऱ्यांच्या हितासाठी  या संस्थांनी मृदा पोषणाच्या माध्यमातून सकारात्मक बदलाचा विडा उचलला आहे,असे ते म्हणाले. अभियानाची गरज रासायनिक शेतीचे दुष्परिणाम आपल्याला जाणवत आहेत, सर्वांच्या आरोग्यावर त्यांचा विपरीत परिणाम होत असून मानावाबरोबरच जनावरांना सुद्धा त्याचा त्रास होत आहे. आपल्या दैनंदिन जीवनात आपण खात असणारी प्रत्येक गोष्ट रासायनिक होत चालली आहे. झटपट पिकाच्या नादात मात्र आपल्याला अनेक दुष्परिणामांना सामोरे जावे लागत आहे. अशा वेळी आपलीच भूमी सुपीक, सुपोषित असणे आपले कर्तव्य आहे या भावनेतून शेतकऱ्यांना तसेच नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे.

अभियानाची माहिती भारतात हजारो वर्षांपासून शेती होत आहे. प्राचीन शेतीमध्ये नैसर्गिक संसाधने म्हणजे पाणी, शेण आणि गोमूत्र आणि सूक्ष्मजीवांच्या मदतीने पृथ्वी आणि पिकाची गुणवत्ता राखण्याची परंपरा आहे. वेद काळापासून  जमीन आपली आई आहे असे आपण मानतो. त्याचे महत्त्व लक्षात घेऊन  भूमी सुपोषण करण्याचा संकल्प करण्यात येत आहे.अशी माहिती यावेळी पूनमताई राऊत यांनी दिली. गावातील भूमिपूजन सोहळ्यासाठी जागा निश्चित करून पूजनाच्या एक दिवस आधी सर्व शेतकरी बांधवांनी घरातील स्वतःच्या शेतातील मूठभर माती आणावी.कुटुंबासह पूजास्थळी माती नेऊन त्यावर सर्वांनी आणलेली माती एकत्रित करून विधिवत पूजा करण्यात येणार आहे. तसेच  देशीगाय वासराची पूजा सुद्धा करण्यात येणार आहे.स्वतःचे,राष्ट्राचे आणि पृथ्वीमातेचे हित जोपासण्यासाठी नैसर्गिक, गो आधारित शेती करण्याचा संकल्प यावेळी कुटुंबांसह शेतकरी करणार आहेत. पश्चिम महाराष्ट्र प्रांतात पुढील महिनाभरात असे  १५० गावांमध्ये भूमी पूजन आणि नैसर्गिक शेतीसाठी संकल्प करून  कीटकनाशक विरहित शेतीसाठी प्रतिज्ञा घेण्यात येणार आहे,असे त्या म्हणाल्या. हजारो वर्षांपासून भारत समृद्ध आहे,हे एक समृद्ध, पर्यावरणप्रेमी राष्ट्र आहे. याची जाणीव ठेऊन नैसर्गिक शेतीसाठी आणि सर्वांचे आरोग्य राखण्यासाठी शेतकऱ्यांना जनजागृती करण्याची मोहीम सुरु आहे. निरोगी पिके, निरोगी मानव आणि निरोगी समाजाची निर्मिती निरोगी मातीतून होऊ शकते,अशीही माहिती त्यांनी दिली. मगर यांनी यावेळी नैसर्गिक शेतीद्वारे यशस्वी झालेल्या शेतकऱ्यांच्या अनुभवांची माहिती दिली तर गो आधारित शेतीचे आरोग्यदायी  फायदे राऊत यांनी यावेळी सांगितले.

पंचगव्य औषध पद्धती ही पर्यायी औषध प्रणाली म्हणून अतिशय प्रभावी आहे. हे अनेक असाध्य रोगांवर उपचार करण्यासाठी प्रभावी आहे. देशात रासायनिक खतांचा अंदाधुंद प्रयोगांमुळे आणि कीटक नियंत्रकांच्या वापरामुळे जमिनीतील सेंद्रिय कार्बनचे प्रमाण सातत्याने कमी होत आहे. विषारी रसायनांच्या वापरामुळे कर्करोगासारखे आजार सातत्याने वाढत आहेत. 2016 मध्ये देशातील सुमारे 6 कोटी मातीच्या नमुन्यांच्या चाचणीच्या अहवालात असे आढळून आले की सेंद्रिय कार्बनचे प्रमाण आता केवळ 0.05 टक्के आहे. ही अत्यंत चिंतेची बाब आहे. या उपक्रमात देशभर गायत्री परिवार, पतंजली योगपीठ, रामकृष्ण मिशन, इस्कॉन, रामचंद्र मिशन, सिद्धगिरी मठ, पिराणा पीठ, स्वदेशी जागरण मंच,राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, वनवासी कल्याण आश्रम, विश्व हिंदू परिषद, सहकार भारती,विद्या भारती, एकल विद्यालय, राष्ट्रीय सेवा भारती, सेंद्रिय शेती परिवार, ग्राम भारती, लोकभारती, ग्राम विकास, गोसेवा, पर्यावरण उपक्रम, दीनदयाळ संशोधन संस्था, एकलव्य  फाऊंडेशन बन्सी, गीर गोशाळा, युथ फॉर नेशन आदी ग्रामीण भागात काम करणाऱ्या ४०  संस्थांचा सहभाग आहे. ही मोहीम चैत्र शुक्ल प्रतिपदा या भूमीच्या जन्मदिवसापासून सुरू झाली आहे. पहिल्या टप्प्यात अक्षय तृतीया पर्यंत तसेच वर्षभर हा उपक्रम आणि  भूमिपूजन कार्यक्रम होणार आहेत. अभियानाचे समन्वयाचे काम अक्षय कृषी परिवार करणार आहे..




## मतदानाचा सेल्फी, रील्स, पोस्टर्स, मिम्स् स्पर्धेचा निकाल जाहीर

### मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी स्पर्धा

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** लोकसभा सार्वत्रिक निवडणूक  - 2024 अंतर्गत चंद्रपूर लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्या वतीने मतदान केल्याचा सेल्फी, रिल्स्, पोस्टर्स आणि मिम्स् स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेला नागरिकांनी उत्स्फुर्त प्रतिसाद देऊन मतदानाची टक्केवारी वाढविण्यात सहकार्य केले. या स्पर्धांचा निकाल जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. आणि मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन यांच्या उपस्थितीत लकी ड्रॉ च्या माध्यमातून नुकताच घोषित करण्यात आला आहे. सन 2019 च्या निवडणुकीत मतदानाची टक्केवारी कमी असल्यामुळे यावर्षी 2024 मध्ये मतदारांमध्ये मतदानाचा उत्साह निर्माण व्हावा, लोकशाही प्रक्रियेत सहभाग नोंदवून मतदानाची टक्केवारी वाढावी, या उद्देशाने स्वीप अंतर्गत जिल्हा प्रशासनाने वेगवेगळे उपक्रम राबविले. तरुण मतदारांमध्ये रिल्स्, पोस्टर्स, मिम्स् बाबत असलेली प्रचंड उत्सुकता पाहता जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांनी ‘माय व्होट इज माय फ्युचर, पॉवर ऑफ वन व्होट’ या थीमवर रिल्स्, पोस्टर्स, मिम्स् तयार करून जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावरून अपलोड करणे, तसेच ‘तुमचे मत द्या आणि आकर्षक बक्षीसे जिंका’ या थीमवर आधारीत मतदान केल्यानंतर शाई लावलेले बोट दाखवत मतदान केंद्रासमोर सेल्फी क्लिक करून फोटो अपलोड करण्याबाबत स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

या स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला असून विजेत्या स्पर्धकांना जिल्हाधिकारी यांच्या हस्ते पुढील आठवड्यात नियोजन भवन येथे पारितोषिक वितरीत करण्यात येणार आहे. स्पर्धेचा लकी ड्रा काढतांना जिल्हाधिकारी कार्यालय येथे उपवनसंरक्षक श्वेता बोड्डू, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) श्याम वाखर्डे व इतर अधिकारी उपस्थित होते. या स्पर्धेचे प्रथम पारितोषिक (अपाची मोटरसायकल) सुरेंद्र देवराव पोहाणे, रा. तुकुम चंद्रपूर यांना, द्वितीय पारितोषिक (रेसींग सायकल) प्रशांत मधुकर गेडाम, रा. मूल यांना तर तृतीय पारितोषिक (ॲन्ड्रॉईड मोबाईल) अशोक ऋषी बारसागडे, रा. चंद्रपूर यांना लकी ड्रॉ च्या माध्यमातून घोषित करण्यात आले आहे. **रिल्स् स्पर्धा :** प्रथम पारितोषिक (15 हजार रुपये) आशिष बोबडे, रा. टिळक वॉर्ड, बालाजी मंदीरजवळ, चिमूर यांना, द्वितीय पारितोषिक (10 हजार रुपये) मंगेश साखरकर, रा. पालगाव, पो. आवाळपूर, ता. कोरपना यांना, तृतीय पारितोषिक (5 हजार रुपये) कोमील ज्ञानेश्वर मडावी, रा. वॉटर सप्लाय कॉर्टर, गोपालनगर, तुकुम, चंद्रपूर यांना लकी ड्रॉ च्या माध्यमातून घोषित करण्यात आले आहे. **पोस्टर्स स्पर्धा :** प्रथम पारितोषिक (5 हजार रुपये) प्रथमेश यशवंत निकोडे, रा. नेहरू नगर, नवीन वस्ती, डीआरसी रोड, चंद्रपूर यांना, द्वितीय पारितोषिक (3 हजार रुपये) आचल राजू धोगडे, रा. शासकीय कन्या वसतीगृह, भिवकुंड (विसापूर) यांना, तृतीय पारितोषिक (2 हजार रुपये) वैष्णवी राजू मिलमिले, रा. तिलक वॉर्ड, बोर्डा, ता. वरोरा यांना लकी ड्रॉ च्या माध्यमातून घोषित करण्यात आले आहे. **मिम्स् स्पर्धा :** प्रथम पारितोषिक (5 हजार रुपये) येवन संतोष येलमुले, रा. सुब्बई, ता. राजुरा यांना, द्वितीय पारितोषिक (3 हजार रुपये) संजय बाबुराव सोनुने, रा. हुडको कॉलनी, अमर चौक, चंद्रपूर यांना, तृतीय पारितोषिक (2 हजार रुपये) अनुप रंगलाल शाहा, रा. मच्छीनाला, मुक्तीकॉलनी, चंद्रपूर यांना लकी ड्रॉ च्या माध्यमातून घोषित करण्यात आले आहे.

## मेंदूच्या आजाराने ग्रस्त रुग्णाला आ. जोरगेवार यांच्या प्रयत्नातून 1 लाखांची आर्थिक मदत

### खासगी रुग्णालयात होणार क्रॅनियोप्लास्टी शस्त्रक्रिया

आधुनिक केसरी न्यूज





**चंद्रपूर :** मेंदु रोग आजाराने त्रस्त असलेल्या रुग्णाला उपचाराकरीता आमदार किशोर जोरगेवार यांच्या प्रयत्नामुळे मुख्यमंत्री सहायता निधी मधून 1 लक्ष रुपयांची मदत करण्यात आली आहे. या निधीतून आता  समीर खाँ रहीमतुल्ला खाँ पठान या रुग्णावर नागपूर येथील खाजगी रुग्णालयात उपचार केला जाणार आहे. समीर खाँ रहीमतुल्ला खाँ पठान या 52 वर्षीय व्यक्तीला मेंदूच्या आजाराने ग्रासले होते. परिस्थिती हलाकीची असल्याने योग्य उपचार करणे त्यांच्याने शक्य होत नव्हते. आजवर अनेक ठिकाणी उपचार घेतला मात्र पैश्याअभावी त्यांच्यावर पूर्ण उपचार होऊ शकले नाही. परिणामी त्यांच्या वेदना त्रासदायक होऊ लागल्या. अश्यात त्यांनी आमदार किशोर जोरगेवार यांच्या जनसंपर्क कार्यालयाशी संपर्क साधला. यावेळी यंग चांदा ब्रिगेडच्या आरोग्य सेवकांच्या वतीने त्यांना सदर आजारावरील उपचारा बाबत माहिती देण्यात आली. तसेच यासाठी मुख्यमंत्री सहायता निधीतुन मदत मिळवून देण्याबाबत आमदार किशोर जोरगेवार यांना कळविण्यात आले. त्यानंतर आमदार किशोर जोरगेवार यांनी पाठपूरावा करत सदर रुग्णाला उपचारा करिता मुख्यमंत्री सहायता निधीतून 1 लाख रुपयांना निधी मिळवून दिला आहे. सदर निधीतुन आता या रुग्णावर नागपूर येथील एका खाजगी रुग्णालयात उपचार केल्या जात असुन त्यांच्यावर क्रॅनियोप्लास्टी शस्त्रक्रिया केली जाणार आहे.

## गडचिरोली जिल्ह्यात रानटी हत्तीचा धुमाकूळ

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** जिल्ह्यात रानटी हत्तीने पुन्हा धुमाकूळ घातला असून भामरागड तालुक्यातील कियर येथील एका शेतकऱ्यास दुपारी ठार केल्यानंतर रात्री त्याच रानटी हत्तीने हिदूर गावात धुडगूस घालून तीन महिलांना गंभीर जखमी केले. महारी देवू वड्डे (५०), राजे कोपा आलामी (५०) आणि वंजे जुरू पुंगाटी अशी जखमी महिलांची नावे आहेत. यातील दोघांची प्रकृती चिंताजनक आहे. महिनाभरापूर्वी कळपातून भरकटलेल्या या हत्तीने तेलंगणा राज्यात दोन शेतकऱ्यांना ठार करून तीन दिवसांपूर्वी भामरागड तालुक्यात प्रवेश केला. काल पहाटे या तालुक्यातील कोसफुंडी गावात सर्वप्रथम हत्तीचे दर्शन झाले.


गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# विखे कुटुंबातील नंतरच्या पिढ्यांनी काय दिवे लावले

## शरद पवार यांची विखे पिता पुत्रावर घणाघाती टीका : लंके यांच्या प्रचारार्थ राहुरी येथे सभा

आधुनिक केसरी न्यूज

**पारनेर :** स्व. धनंजय गाडगीळ, विठ्ठलराव विखे यांनी आशिया खंडातील पाहिला सहकारी साखर कारखाना उभा केला. त्यानंतर विखे यांच्या नंतरच्या पिढ्यांनी काय दिवे लावले, असा सवाल करतानाच, त्यांच्या डोक्यात सत्तेची हवा गेली असून आपले अपयश झाकण्यासाठी ते आता टीका टिपन्नी करीत असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरदचंद्र पवार गट) अध्यक्ष शरद पवारांनी केला.

महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांच्या प्रचारार्थ राहुरी येथे आयोजित करण्यात आलेल्या सभेत शरद पवार बोलत होते. यावेळी माजी खासदार प्रसाद तनपुरे, माजी मंत्री प्राजक्त तनपुरे, आमदार लहू कानडे, मा. आ. दादा कळमकर, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख प्रा. शशिकांत गाडे, 'आप'चे जिल्हाध्यक्ष राजू आघाव, रावसाहेब म्हस्के, संदीप वर्पे, योगिता राजळे, अरूण कडू, किरण कडू, अरूण तनपुरे, सचिन म्हसे, अमृत धुमाळ, राजूभाऊ शेटे, धनराज गाडे, बाळासाहेब आढाव, प्रकाश देठे, सुरेश वाबळे, मच्छिंद्र सोनवणे, संपत म्हस्के यांच्यासह मोठा जनसमुदाय यावेळी उपस्थित होता.

पवार म्हणाले की, दुष्काळी जिल्हा म्हणून नगरची ओळख होती. त्या काळात जिरायत भागाच्या जमीनी बागायती करण्यासाठी निळवंडे प्रकल्प उभा करण्याचा निर्णय झाला. मात्र त्यावेळी,आज जे लोकसभा निवडणुकीच्या रिंगणातील विरोधी उमेदवार आहेत त्यांच्या वाडवडीलांनी निळवंडेला विरोध केला. आता ते पुन्हा लोकसभेमध्ये जाऊ पाहत आहेत. त्यांना रोखण्याचे काम करावेच लागेल असे पवार म्हणाले. खा. विखे यांना टोला लगावताना पवार म्हणाले की, कोणी इंग्रजी बोलतो म्हणून शहाणा झाला असे होत नाही. तुमचे इंग्रजी बोलणे तुम्हाला लखलाभ. नीलेश लंके यांच्यासारखा फाटका माणूस, फाटक्या माणसाच्या हिताची जपवणूक करणारा असल्याने लंके यांना मताधिक्क्याने लोकसभेत पाठवण्याचे आवाहन पवार यांनी केले. दहा वर्षे ज्यांच्या हाती सत्ता आहे त्यांनी काय काम केले असा सवाल करून पवार म्हणाले, मोदी सरकारने केलेली कामे या निवडणुकीच्या प्रचारात मांडली पाहिजेत मात्र तसे होताना दिसत नाही. दहा वर्षांपूर्वी मनमोहनसिंग यांच्यावर टीका करून मोदी हे महागाईवर बोलत होते. सत्ता हाती दिल्यानंतर १५ दिवसांत ५० टक्के महागाई करणार असे मोदी सांगत होते. ७० रूपयांचे पेट्रोल १०६ रूपयांवर गेले हे पन्नास टक्के महागाई करण्याचे वचन का ? ४०० रूपयांचे सिलेंडर ११६० वर गेले असल्याचे पवार म्हणाले.

**कांदा प्रश्नी आंदोलन केले म्हणून मी गुंड का ?** : अलिकडेच विखे पिता पुत्र केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी भेटले. कांदा निर्यात बंदी उठविण्यासाठी भेट घेतल्याचा गवगवा केला. नगरच्या बाजार समितीमध्ये सत्कार स्विकारात निर्यात बंदी उठविली गेली नसती तर मते मागण्यासाठी गेलो नसतो अशी बतावणीही केली. निळवंडे, साकळाई, ताजनापुर या योजना झाल्या नाही तर निवडणूकीचा अर्ज भरणार नाही अशी प्रतिज्ञा करणारे खासदार यांचे काम खोटे बोल व रेटून बोल असे आहे. त्यांचे काम मात्र शुन्य आहे. विखे कुटूंबाने गेल्या ५० वर्षात जिल्हयात एखादा मोठा प्रकल्प आणला का ? दहा, विस हजार तरूणांना रोजगार मिळाला का ? त्यांच्या घराकडे जाणारा नगर–मनमाड रस्ता त्यांना करता आला नाही ते खासदार विकासाच्या काय गप्पा मारतात ? मी कांद्याच्या भावासंदर्भात आंदोलन केले, त्यामुळे माझ्यावर गुन्हा दाखल झाला, त्यामुळे मी गुंड का असा सवाल लंके यांनी यावेळी बोलताना केला.

**त्यांच्या गॅरंटीचा चेक वटत नाही !** : या निवडणूकीत मोदी गॅरंटीचा गवगवा केला जातोय. ही टीकाऊ गॅरंटी नाही. त्यांच्या गॅरंटीचा चेक वटत नाही. मोदी यांनी सत्तेचा गैरवापर केला. ईडी, सीबीआयच्या माध्यमातून खोट्या केसेस केल्या. त्यांच्या विचाराविरोधात वागले तर इडी, सीबीआयचा वापर करून त्रास देण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे पवार म्हणाले.

**जिल्ह्यात सत्तेचा गैरवापर, दमदाटी** : राज्यात उत्तम साखर कारखाना म्हणून ओळख असलेला राहुरी साखर कारखाना, मुळा प्रवरा वीज संस्था या संस्था विखे यांनी बंद पाडल्या. शासकीय मेडीकल कॉलेज जिल्ह्यात होऊ दिले नाही. त्यांच्या खासगी मेडीकल कॉलेजमध्ये प्रवेश कशा पध्दतीन दिले जातात, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. जिल्ह्यात सत्तेचा गैरवापर, दमदाटी सुरू असल्याचा आरोप पवारांनी केला.



# ग्रामसेवक, पोलिस पाटलावर गुन्हे दाखल करा

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील धामणगाव येथील ग्रामसेवक, पोलिस पाटील व उपसरपंचासह काही पदाधिकाऱ्यांनी निळ्या झेंड्याचा अवमान केला. यातून दोन समाजामध्ये जातीय तेढ निर्माण करत जातीय दंगल भडकवायचा प्रयत्न केला. या प्रकरणी दोषींना निलंबित करुन गुन्हे दाखल करण्यात यावे अशी मागणी फुलंब्री तहसीलदार यांच्यासह जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे मंगळवारी मागणी करण्यात आली आहे.

धामणगाव येथील ग्रामसेवक सुरेश गजेवाड व पोलीस पाटील डिडोरे व माजी उपसरपंच कलीम पटेल यांनी १७ एप्रिलरोजी दुपारी एक वाजता निळा झेंडा पत्र नसतांनी ध्वज काढला. बौद्ध समाजाच्या भावनेशी खेळून दोन जाती मध्ये दंगल घडवून आणण्याच्या उद्देशाने ग्रामसेवक व कलीम पटेल व पोलीस पाटील सोमनाथ हंडे, नयुम पटेल, मुस्तफा पटेल आदीनी डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्या समोरील निळा झेंडा काढला. त्यामुळे सर्व बौद्ध समाजात भितीचे वातावरण निर्माण झाले असल्यामुळे संबंधित गुन्हेगार यांना ॲट्रॉसिटी ॲक्टनुसार त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा.

संबंधितांना निलंबित करून त्यांच्या वर गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी करण्यात आली आहे. यावेळी बौध्द समाजाच्या वतीने या निवेदनाद्वारे दिला आहे. या निवेदनावर पुष्पा मोरे, भगवान गंगावणे, रंजित वाहुळ, लक्ष्मीबाई भोसले, रत्नमाला वाहुळ, संजय जाधव, समाधान इंगळे, राहुल नवतुरे, जितेंद्र वाहुळ, भरत भोसले आदि शेकडो समाज बांधवांच्या स्वाक्षरी आहेत.

# 'आयुष्यात पैसा देखील महत्त्वाचा आहे'

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** भवसागर तरुण जायचं असेल तर सदगुरू ची गरज आहे पैशाची गरज नाही. म्हणून सतत सदगुरुच्या संनिध्यात पुण्य करत राहावे व आपल्या जीवनाचे सार्थक होईल, असे मुक्ताई महाराज काळे चाळक व महेश महाराज काळे मंदिर बांधण्यासाठी देखील पैसा लागतो. बिना पैशाचे वादक, मंडप, कीर्तनकार येत नाही म्हणून आयुष्यात पैसा देखील महत्त्वाचा आहे, असे वेरूळ येथील अन्नपूर्णा कैलास आश्रम येथील भागवतानंदगिरिजी यांच्या तृतीय पुण्यतिथी सप्ताह निमित्ताने आयोजित किर्तनात बोलत होते. अखंड हरिनाम सप्ताह अन्नपूर्णा कैलास आश्रमाचे मठाधिपती स्वामी अभयानंदगिरीजी महाराज यांची प्रमुख उपस्थितीत सुरू आहे. आज दिनांक २५ रोजी सप्ताहाचा दुसरा दिवस होता. मुक्ताई महाराज काळे चाळक व महेश महाराज काळे या पती पत्नी महाराजांची जुगलबंदी कीर्तनाने पंचक्रोशीतील हजारो भाविकांनी लाभ घेतला. महेश महाराज काळे यांनी द्रव्याची गरज तर मुक्ताई महाराजांनी सदगुरु चा आशीर्वाद या विषयावर अनेक दाखले देत किर्तनात रंगत आणली. यावेळी कीर्तन झाल्यानंतर भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.



# मोफत तपासणी शिबिर व औषधी वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील सुलताने पा. प्रतिष्ठान यांच्या वतीने हनुमान जन्मोत्सव निमित्त मंगळवार दि. २३ रोजी सकाळी १० ते २ या वेळेत श्री. भद्रा मारोती मंदीर सभागृह येथे मोफत तपासणीशिबीर व औषधी वाटप कार्यक्रम घेण्यात आला. अध्यक्ष म्हणून श्री. भद्रा मारोती संस्थानचे अध्यक्ष मिठू पा. बारगळ (दादा) होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख मान्यवर रामनाथ पा. बारगळ, ज्ञानेश्वर पा. बारगळ, बाबासाहेब पा. बारगळ, परसराम पा. बारगळ, नवनाथ पा. बारगळ, सुरेश पा. मरकड, राजेंद्र पा. जोंधळे, योगेश पा. बारगळ, गजानन पा. फुलारे, अरुण पा. तंबारे, फकिरचंद पा. काळे, मनोहर पा. काळे, पांडुरंग पा. काळे, विष्णु पा. फुलारे, अजिनाथ पा. नलावडे, संदीप पा. तंबारे, कैलास पा. फुलारे, सुनिल घोडके, देवदत्त कोठारे, किशोर पुसे, दिनेश सावजी, राजेश थोरात, अमोल काळे, गोरव जोंधळे, विरेंद्र वाघ व असंख्य पदाधिकारी, पत्रकार व मित्र मंडळी आदी उपस्थित होते. यावेळी जवळपास ८० ते १०० भाविकांनी व नागरीकांनी तपासणी करुण औषधीदेखील घेतले. कार्यक्रम यशस्वी करणेकरिता सुलताने पाटील प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष डॉ. भागवत पा सुलताने, उपाध्यक्ष-दादाराव पा. बेडके, सचिव-सौ. सोनुबाई गोराडे, सहसचिव- अंकुश पा. बेडके, कोषाध्यक्ष शरद सुलताने सदस्य- योगेश पा. काकडे, रघुनाथ पा. सुलताने व सर्व कार्यकारीनी, सर्व सभासदांनी परिश्रम घेक्ले. विशेष सहकार्य :- पो. नि. फराटे साहेब, सौ.आरती जाधव मॅडम (एपीआय), डॉ. प्रफुल्ल गायकवाड (वै. अधिक्षक खु. बाद. ग्रा.रु.), बहुरे साहेब, डॉ. बिस्मिल्लाह मिर्झा, डॉ. अतुल मरुगकर, सचिन पालवे,किरण देशमुख, ताठे साहेब, डाके साहेब, अल्लावाले शाह, अनिकेत पवार, गणेश बरगळ, सचिन चव्हाण, प्रभाकर बोडखे, काकासाहेब कदम, संपत नाईक. सुत्रसंचालन : डॉ. भागवत पा. सुलताने संस्थापक अध्यक्ष (सुलताने पाटील प्रतिष्ठान) यांनी केले व अल्लावाले शाह यांनी मान्यवरांचे, भाविकांचे, रुगणांचे व उपस्थितांचे आभार मनले.




शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार

किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | अॅल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

# अॅड. उषा दराडेंचे अजित पवारांना पत्र





आधुनिक केसरी

**ना. अजीत पवार,**
**उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.**
**नमस्कार,**

तुम्हास सन्माननीय लिहावे का, दादा लिहावे का या बाबत मनात संभ्रम निर्माण झाला आहे. म्हणून लिहित नाही. असो!

परवा आपण म्हणालात, महिलांची संख्या पुरूषांच्या तुलनेत कमी होत आहे. तेव्हा परत द्रोपदीच्या विचार करावा की काय! हा उच्चार करताना हसत होतात. या बाबत तुम्हाला असे वक्तव्य करावे असे वाटले याचे आश्चर्य नाही.

द्रोपदीचे वस्त्रहरण भर दरबारात झाले. द्रोपदी ह्या त्यावेळी समाज व्यवस्थेच्या बळी होत्या. आज तशी परिस्थिती नाही.

स्वातंत्र्य पूर्व काळापासून स्त्री समानता, स्त्री समक्षमीकरण, स्त्रीयांचे आर्थिक सबलीकरणाच्या चळवळी झाल्या. महात्मा जोतीबा फुल्यांनी तर क्रांती ज्योती सावित्रीला हाताशी धरून क्रांतीची जोत पेटवली. देशात अर्धी शक्ती महिलांची आहे. तिच्या शक्तीचा वापर देशाच्या विकास प्रक्रियेत सन्मानपुर्वक समान रितीने होणे अपेक्षीत आहे. घटनेने आम्हास समान अधिकार दिले आहेत. कायदे पास करताना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी समाजाभिमूख कायदे व्हावेत यासाठी संघर्ष केला. वेळ प्रसंगी मंत्रीपदाचा राजीनामा देण्याची तयारी दाखवली पण महिला सक्षमीकरणाचे कायदे अस्तित्वात आणले. तुम्हाला हे कसे समजत नाही की, द्विभार्या प्रतिबंधक कायदा आहे. तसेच स्त्रीयांनाही एकच पती करण्याचा अधिकार आहे. सत्तेचा वापर कायद्याचे पालन करायचे सोडून आपण कुठल्या युगाचे समर्थ करीत आहात?

मा.शरद पवार संरक्षण मंत्री असताना अमेरिकेत त्यांचे विमान उतरले तेव्हा अधिकारी स्वागताला असत. साहेब देशात परत आले व त्यांनी नौदल, वायुदल, सैन्यदलाच्या अधिकाऱ्यांची बैठक बोलावली, अधिकाऱ्यांना त्यांनी प्रस्ताव ठेवला की, सर्व दलात महिला अधिकारी नेमू. अधिकाऱ्यांनी विरोध केला. तीन बैठका झाल्या पण अधिकारी तयार होईनात. तेव्हा साहेबांनी त्यांचा निर्णय दिला व कायदा केला. आज देशात सर्व दलात वैमानिकांसह सर्व जागांवर महिला आहेत. विमान अपघाताचे प्रमाण पुरूषांच्या तुलनेत महिलांचे कमी आहे हे तुम्हास ठाऊक आहे काय?

मा.शरद पवार मुख्यमंत्री होते. त्यांनी महाराष्ट्रात प्रथम महिला आयोगाची स्थापना केली. त्या आयोगाच्या घटनात्मक पदावर श्रीमती रूपाली चाकणकर आहेत. त्या तुमच्या सुविद्य पत्नी सन्माननीय सुनेत्रा पवार यांच्या प्रचारात दिसतात. रूपालीताई पत्रकार परिषदेत सुनेत्रा वहिनी ऐवजी स्वतः उत्तरे देतात. सुनेत्रा वहिनींचा हा अपमान तुम्हास कसा चालतो?

मा.शरद पवार मुख्यमंत्री असताना त्यांनी वारसा हक्क कायद्यात बदल करायचे ठरवले. त्यांनी महिलांना वंशपरंपरागत मालमत्तेत इतर हक्कात, अधिकार होता तो भावाच्या बरोबरीने अधिकार द्यायचा असे त्यांनी ठरवले. तसा प्रस्ताव आमदारांच्या समोर ठेवला, बहुतांश आमदारांनी त्यास विरोध केला. प्रशासकीय अधिकाऱ्यांनी दुरूस्ती सभागृहासमोर मांडली.

परंतू प्रस्ताव मांडताना त्यात एक उपसुचना मांडली की, महिलांना मालमत्ता विकाताना भावाची परवानगी घ्यावी लागेल. पद्मश्री लक्ष्मण माने त्यावेळी विधान परिषदेचे सदस्य होते. ही बाब लक्ष्मण माने यांनी शरद पवार साहेबांच्या लक्षात आणुन दिली. पवार साहेबांनी त्वरीत सभागृहात गेले उपसुचना काढून टाकली व वारसाहक्काचे बील पास करून घेतले. महिलांचा सन्मान केला. ऐवढेच नाही तर मा.शरद पवार यांनी महिलांना कौटुंबीक कलहात न्यायालयीन लढाई लढताना खर्च लागू नये म्हणून कोर्ट फिस कायद्यात दुरूस्ती करून कोर्ट फीस माफीचा कायदा आणला. शिक्षणात आरक्षण दिले. नोकरीत आरक्षण दिले.

पंचायत राजमध्ये महिलांना तीस टक्के आरक्षण देण्याचा निर्णय शरद पवार मुख्यमंत्री असताना देण्यात प्रथम महाराष्ट्रात झाला. देशात राजीव गांधी पंतप्रधान असताना 33 टक्के पंचायतराजमध्ये आरक्षण देण्याचा कायदा केंद्राने पास केला. त्याची अंमलबजावणी करणारे महाराष्ट्र पहिले राज्य होय. आता तर 50 टक्के आरक्षण आहे. तेही कॉंग्रेस व राष्ट्रवादीच्या कार्यकाळात झाले यासाठी मा.शरद पवार आग्रही होते. कायदा, शासन, न्यायव्यवस्था या समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी असतात, समाजकारणात व रजाकारण या एका नाण्याच्या दोन बाजू आहेत हे तुम्हाला कधी समजलेच नाही. मा.शरद पवार यांच्या फुले, शाहू, आंबेडकरांच्या विचारांच्या प्रवाहात राहुनही तुम्ही मनुवादीच राहीलात याचे दुःख वाटते.

आपल्या भाषणात आपण कधी छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतीबा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा उल्लेख करताना दिसत नाहीत. मणिपुरमध्ये महिलांची नग्न धिंड काढण्यात आली. रोज अनेक महिलांवर सामुदायीक बलात्कार होतात. स्त्री भ्रुणहत्या होतात. अल्पवयीन मुलींची लग्न होतात. मुली बेपत्ता होतात यावर एक शब्द आपण बोलत नाहीत. एकदम द्रोपदी कशी काय आठवली? तुम्हास हे सगळे सांगुन काय उपयोग? आपण मनुवाद्याच्या मांडीला मांडी लावुन बसला आहात?

नरेंद्र मोदीची स्तुती करून वेळ मिळाला तर सामाजिक समता, कायदे, लोकशाही, धर्मनिरपेक्षता, एकसंघता याबाबत कधी विचार करता आलातर बघा! नसता काय, पालथ्या घड्यावर पाणी!! कळावे.

**लोभ नसावा.**
**आपली कधीच नसलेली**
**अॅड.उषा दराडे**
**माजी आमदार**

# बचत गटांच्या महिलांची आरोग्य तपासणी करत मतदान जनजागृती

आधुनिक केसरी न्यूज



**कन्नड :** नगर परिषद, कन्नड व संत तुकाराम महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामीण रुग्णालय कन्नड येथे १५० बचत गटांच्या महिलांची मोफत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. ग्रामीण रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. प्रवीण पवार यांनी सर्व महिलांना मार्गदर्शन करत असताना आपल्या ग्रामीण रुग्णालयात सी बी सी, थायरॉईड, किडनी फंक्शन चाचणी, लिव्हर फंक्शन चाचणी ई चाचणी अगदी मोफत करून मिळतात. त्यामुळे भविष्यातील धोका वेळीच ओळखून या चाचण्यांचा लाभ सर्व लाभार्थ्यांनी घ्यावा असे आवाहन केले. त्याच वेळी जागतिक हिवताप दिनानिमित्त उपस्थित जनसमुदायास शपथ देण्यात आली.

शिबिरास उपस्थित असलेल्या सर्व महिलांना मतदान करणे का आवश्यक आहे याचे मार्गदर्शन करत असताना १०५ कन्नड विधानसभा मतदार संघाचे स्वीप पथकाचे प्रमुख योगेश पाटील यांनी एकूण मतदार संख्येत ५० टक्के संख्या असताना देखील महिला मतदानास पुढे येत नाही व आपल्या देशाच्या समस्या, पुढे येणारे संकट त्यांना कधी कळतच नाही. आता महिलांनी फक्त चूल आणि मूल या संकल्पनेत न राहता यापुढे जाऊन लोकशाहीच्या या उत्साहात कुठेही कमी न पडता येणाऱ्या १३ तारखेला सह कुटुंब भरघोस मतदान करावे असे आवाहन केले. यावेळी कन्नड स्वीप पथक प्रमुख प्राचार्य डॉ सुनिता शिंदे -देशमुख, संत तुकाराम महाविद्यालय येथील एन एस एस प्रोग्राम ऑफिसर डॉ. पवार, डॉ. मोरे, डॉ. देशमुख, ग्रामीण रुग्णालय कन्नड येथील सर्व वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी असेच नगर परिषद कन्नड येथील उपमुख्यअधिकारी शितल चौधरी सहाय्यक प्रकल्प अधिकारी प्रतिभा कदम, १०५ कन्नड स्वीप सदस्य भाऊसाहेब सोननिस, स्वाती सोनवणे, ज्ञानेश्वर इस्थापे, कल्पना नवले, प्रवीण दाभाडे तसेच कन्नड शहरातील जवळपास १५० बचत गटातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# रावसाहेब दानवेंची सरंजामशाही संपणार : मचे

## लाट परिवर्तनाची : डॉ. कल्याण काळे यांचा विजय पक्का !

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** सोयगाव तालुक्यात व सावळदबारा परिसरात बहुतेक सर्व वाहिन्या आणि संस्थांच्या सर्वेमध्ये नगर जालना लोकसभा मतदारसंघातून महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ कल्याण काळे निवडणूक जिंकतील असे सावळदबारा येथे महा विकास आघाडीची आढावा बैठक संपन्न झाली. त्यावेळी उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे तालुका अध्यक्ष दिलीप मचे हे बोलत होते, अशी शक्यता वर्तवली जात आहे. हे एकप्रकारचे सुचिन्ह असून नगर जालना रावसाहेब दानवे मतदारसंघाला घराण्याच्या सरंजामशाहीतून मुक्ती मिळेल अशी आशा सर्वसामान्य सोयगाव तालुक्यातील नागरीकांनी व्यक्त करीत आहेत. महाविकास आघाडीचे कॉंग्रेसचे उमेदवार डॉ कल्याण काळे यांची निशाणी हातांचा पंजा आहे यांनी एक एप्रिलपासून मतदारसंघात नगर डॉ कल्याण काळे स्वाभिमान यात्रा सुरू केली असून या माध्यमातून ते मतदारांशी संवाद साधत आहेत. त्यांच्या यात्रेला भरघोस प्रतिसाद मिळत आहे. अगदी विरोधी गटातील अनेक मातब्बर मंडळींनी तुतारी हाती घेऊन काळे यांचे हात बळकट केले आहेत. वृत्तवाहिन्यांच्या सर्वेनुसार जालना लोकसभा मतदारसंघात डॉ कल्याण काळे हे रावसाहेब दानवे यांचा पराभव करतील अशी शक्यता वर्तवली आहे. गेली अनेक वर्षांपासून रावसाहेब दानवे घराण्याने जिल्ह्यावर निर्विवाद वर्चस्व गाजविले आहे.रावसाहेब दानवे हे अनेक वर्षे खासदार आहू याखेरीज त्यांनी केंद्रीय मंत्रीपद देखील भुषविले आहे. असून ते विद्यमान सरकारमध्ये रेल्वे मंत्री आहेत.रावसाहेब दानवे घराणे हे राज्यात आणि केंद्रात ज्याची सत्ता असते त्याची तळी उचलण्याबाबत प्रसिद्ध आहेत. जनता त्यांच्या या पलटीमार धोरणाला कंटाळली आहे. याशिवाय या पलट्या मारताना मोठ्या प्रमाणात आर्थिक व्यवहार होत असून विकासाच्या नावावर छत्रपती संभाजीनगर, सोयगाव तालुक्यात जिल्ह्यामध्ये काहीही भरीव होताना दिसत नाही. यामुळेच यंदाची निवडणूक जनतेने हाती घेतली असून सर्वसामान्य जनता विरुद्ध राजपुत्र असा संघर्ष होताना दिसत आहे. यामध्ये जनता विजयी होण्याची चिन्हे असून राजपुत्राला घरी बसावे लागणार असल्याचे ठाकरे गटाचे दिलीप मचे राजपूत शिवसेना उद्धवजी बाळासाहेब ठाकरे सोयगाव तालुका प्रमुख जिल्हा छत्रपती संभाजीनगर यांनी बोलताना सांगितले आहे.

# जुगार अड्ड्यावर धाड; 5,03190 लाखांचा मुद्देमाल जप्त

आधुनिक केसरी न्यूज



**कन्नड :** पोलीस अधिक्षक मनिष कलवानिया यांनी जिल्हयातील चोरटया रित्या चालणारे अवैध धंदे बाबत सक्त भूमिका घेवुन अशा धंद्यावरीती सातत्याने धाडी घालुन त्यांचे विरुध्द सक्त कारवाईचा बडगा उगारत असे धंदे चालविणारे चालक व मालकां विरुध्द गुन्हे दाखल करण्याचे निर्देश दिले आहेत. यावरुन पथकाने मागील काहि दिवसांमध्ये पोलीस ठाणे अजिंठा, पाचोड, फुलंब्री, देवगाव रंगारी, कन्नड ग्रामीण हद्यीतील ऑनलाईन चक्री चालक, तसेच अवैध जुगार अडयावर छापेमारी करून 32 जुगारी व्यक्ती विरुध्द गुन्हे दाखल करून 17,06,870/- रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याअनुषंगाने मा. पोलीस अधीक्षक यांचे विशेष पथकास दिनांक 25/04/2024 रोजी माहिती मिळाली कि, नागद चाळीसगाव रोडवरिल हॉटेल आदित्य परमिट रूम व बिअरबारचे पाठीमागील भागात असलेल्या पत्र्याचे शेडमध्ये काही व्यक्ती हे तिरट व झन्ना- मन्ना नावाचा जुगार हा पत्त्यावर (कॅट) खेळत व खेळवित आहे अशी माहिती मिळाली होती. यावरून पथकाने कारवाईच्या अनुषंगाने हॉटेल आदित्य परमिट रूम व बिअरबार चे परिसराची बारकाईने व छुप्यापध्दतीने पाहणी केली असता हॉटेलच्या परिसरात मोठया प्रमाणावर मोटरसायकली उभ्या असलेल्या दिसुन आल्याने तसेच हॉटेलच्या पाठीमागील भागात असलेल्या एका पत्राचे शेड मध्ये काही व्यक्तींची संशयीत हालचाल नजरेस पडली. यावरुन सापळा लावुन छापा मारण्याचे नियोजन केल्यानुसार विशेष पथकांने दुपारी 4:30 वाजेच्या सुमारास लपत छपत जावुन अचानक पत्र्याचे शेडच्या बाजुला दबा धरून अचानक छापा टाकला असता, तिथे 13 ते 14 ईसम हे पत्यावर तिर्रट व झन्ना मन्ना नावाचा जुगार खेळतांना दिसुन आले. पोलीसांनी अचानक झडप घालुन कारवाई केल्याने जुगारी ईसमांची धांदल उडाली व यातील काही ईसम हे मिळेल त्या रस्त्याने सैरावैर पळत सुटले परंतु तरीही पथकातील पोलीसांनी त्यांचा पाठलाग करून 05 जुगारी ईसामांना ताब्यात घेण्यात आले आहे. तसेच त्यांचेकडुन समजले कि सदरचा पत्यांचा कल्ब हा राजेंद्र शेषराव राठोड वय 45 वर्षे रा. जाधववाडी टी.व्ही. सेंटर, छत्रपती संभाजीनगर हा अवैधरित्या चालवित आहे.

यामध्ये 1) भावगिर निंबागिर गोसावी वय 31 वर्षे रा. हारसवाडी ता. कन्नड 2) दगडु शंकर राठोड वय 45 वर्षे रा. गोपेवाडी ता.कन्नड 3) अनिल बाबु चव्हाण वय 24 वर्षे रा. हारसवाडी ता. कन्नड 4) राहुल काकाजी झाल्टे वय 31 वर्षे रा. हातले ता. चाळीसगाव 5) निलेश दिलीप राजपूत वय 35 वर्षे रा. नागद ता. कन्नड असे मिळुन आले आहेत.

नुमद कारवाई मध्ये रोख 24190/- रुपयांसह 09 दुचाकी वाहने, मोबाईल फोन, पत्ताचे कॅट, इतर जुगाराचे साहित्य असे एकुण 5,03190/- रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद आरोपीविरुध्द पोलीस ठाणे कन्नड ग्रामीण येथे महाराष्ट्र जुगार कायदा कलम 12 (अ) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास पोलीस ठाणे कन्नड ग्रामीण हे करित आहेत. नमुद कारवाई ही मनिष कलवानिया, पोलीस अधीक्षक यांचे विशेष पथकातील स.पो.नि. सुदाम सिरसाठ, पोलीस अंमलदर नवनाथ कोल्हे, रामेश्वर धापस, गणेश सोनवणे यांनी केली आहे.

# मतदानाच्या लोकोत्सवात मतदारांचा उत्साह !

## भोकरला शांततेत मतदान : प्रशासनाने घेतली खबरदारी

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** मागील पंधरा दिवसांपासून लोकसभा निवडणूकीमूळे राजकीय वातावरण प्रचाराने ढवळून निघाले आहे. शुक्रवारी(ता.२६) मतदान केंद्रावर जाऊन वयोवृद्ध महिला,जेष्ठ नागरिक,नवयूवक आणि दिव्यांग मतदारांनी उन्हाची  पर्वा न करता मतदानाचा हक्क बजावला आहे. सर्वच राजकीय पक्षांचे भवितव्य आज मतपेटीत बंद झाले आहे. कोण बाजी मारणार यांची आता उत्सुकता लागली आहे.
नांदेड लोकसभा निवडणूक रिंगणात सर्वच राजकीय पक्षांनी तगडे उमेदवार दिले असल्याने चूरस वाढली आहे. काँग्रस, भाजपा आणि वंचित असा तिरंगी सामना होणार आहे. शुक्रवारी मतदान करण्यासाठी मतदारांनी उन्हाची तीव्रता लक्षात घेऊन सकाळी व सायंकाळी मतदान करण्यासाठी केंद्रावर गर्दी केली होती.तर काहि मतदारांनी उन्हाची तमा न बाळगता भरदूपारी मतदानाचा हक्क बजावला आहे.तालुक्यात सर्वत्र शांततेत मतदान प्रक्रिया पार पडली आहे. यासाठी प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवला होता. केंद्रालगत असलेल्या सर्व व्यापा-याची दुकाने बंद



ठेवण्यात आली होती.केंद्रावर मतदारांची गैरसोय होऊ नये म्हणून प्रशासनाने योग्य ती खबरदारी घेतली होती. काँग्रेसचे उमेदवार वसंत चव्हाण, भाजपाचे माजी मंत्री डॉ. माधवराव किन्हाळकर यांनी भेट देऊन केंद्राची पाहणी केली. यावेळी किन्हाळकरानी मतदानाचा हक्क बजावला आहे.



# मुख्यमंत्री संभाजीनगरवरून जाताच शिंदे गटाला धक्का

## शहरप्रमुख संजय बारवालांची घरवापसी

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू असताना शिंदे गटाला धक्का बसला आहे. मुख्यमंत्री शिंदे यांचा संभाजीनगवरून जाताच छत्रपती संभाजीनगर पश्चिमचे शहरप्रमुख संजय बारवाल यांची घरवापसी केली. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याहस्ते मातोश्री निवासस्थानी संजय बारवाल यांना शिवबांधुन पक्ष प्रवेश केला. यावेळी शिवसेना उपनेते विनोद घोसळकर, शहरप्रमुख विजय वाघचौरे, माजी नगरसेवक अविनाश कुमावत, शिवसैनिक संतोष बारवाल, सागर वाघचौरे आदी उपस्थित होते.



# सार्वजनिक बांधकाम मंत्री दादा भुसे यांनी साधला शिवसेना व भाजप कार्यकर्त्यांशी सुसंवाद

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** शिर्डी लोकसभा मतदार संघातील शिवसेनेचे (शिंदे गट)उमेदवार सदाशिव लोखंडे यांच्या प्रचारार्थ सार्वजनिक बांधकाम मंत्री दादा भुसे यांनी नेवासा येथील शिवसेना व भाजप पदाधिकाऱ्यांशी सुसंवाद साधून प्रचाराच्या दृष्टीने आढावा घेतला. यावेळी ना.भुसे यांच्या समवेत शिवसेनेचे सचिव विक्रम चौधरी हे देखील उपस्थित होते. यावेळी भाजप सेनेच्या कार्यकर्त्यांनी त्यांचा सत्कार केला यावेळी ना.भुसे व विक्रम चौधरी यांनी श्री खोलेश्वर गणपतीची पूजा करून दर्शन घेतले.

यावेळी शिवसेना( शिंदे गट)शिवसेनेचे जेष्ठ कार्यकर्ते अँड.के एच वाखुरे,अँड. भाऊसाहेब पाटील वाघ,जिल्हा संपर्क प्रमुख बाळासाहेब पवार,उपाध्यक्ष बंडू शिंदे, भाजपचे राज्य कार्यकारिणी सदस्य निरंजन डहाळे, भाजपचे युवा नेते मनोजभाऊ पारखे,आदिनाथ पटारे उपस्थित होते



# शाखाधिकारी प्रशांत फुसे रुजू; प्रदीप चव्हाण यांनी केला सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील महाराष्ट्र ग्रामीण  बँक ला 3 वर्षांपूर्वी ग्रामीण भाग म्हणून बँक मॅनेजर पदावर मयूर सोनटक्के यांची नियुक्ती झाली होती आज दि.२३/४/२४ एप्रिलला त्याच्या कार्यकिर्द ला 3 वर्ष पूर्ण झाल्यामुळे त्याची बदली झाली असून त्यांच्या जागेवर आता शाखाधिकारी प्रशांत फुसे अभंयीचे हे रजू झाले आहे. शाखाधिकारी प्रशांत फुसे हे महाराष्ट्र ग्रामीण अभंयी शाखेला तिथून त्यांची बदली आता सावळदबारा येथे शाखाधिकारी पदी झाली असून रुजू पण झाले आहे.

त्यांना सावळदबारा येथील त्यांनी महाराष्ट्र ग्रामीण बँकेचा पदभार स्वीकारला, यावेळी नांदा तांडा येथील प्रदिप चव्हाण सोयगाव तालुका उपाध्यक्ष व रहीम खान पठाण पत्रकार यांच्या वतीने त्यांना शाल, श्रीफळ व भेटवस्तू देऊन मोठा सत्कार करण्यात आला व या नंतर शाखाधिकारी प्रशांत फुसे हे कामकाज बघणार आहे.याप्रसंगी आफिसर काशीनाथ वावरे, कॅशीअर शिवा जैस्वाल, शिपाई राम जोशी हे उपस्थित होते. वर्षात या गावाला व परिसरातील डाभा,मोलखेडा, हिवरी, चारुतांडा जामठी घाणेगाव तांडा नांदा, सावळदबारासह गावाला आपले मानून घेणार. जमेपर्यंत कोणाचेही काम रुकु देणार नाही आणि जास्तीत जास्त युवकांना मार्गदर्शन करेल व ज्यांना गरज आहे त्यांना प्रांतप्रधान यांची मुद्रा योजना देऊन सहकार्य करुन कर्ज उपलब्ध करून देईल असे मत शाखाधिकारी प्रशांत फुसे यांनी व्यक्त केले, अशी पत्रकार रहीम खान पठाण यांनी बोलताना दिली.

# भिस्तबाग जिल्हा परिषदेत शाळेतील चौथीच्या विद्यार्थ्यांना निरोप

## गुणवंत विद्यार्थ्यांचा स्टुडंट्स ऑफ द इयर पुरस्काराने सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** शहरालगत असलेल्या भिस्तबाग जिल्हा परिषद शाळेतील इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला. तर गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करुन वेदांत विकास वजन व जय नागनाथ काजळकर यांना स्टुडंट्स ऑफ द इयर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.
अद्यावत व गुणवत्तापूर्ण शिक्षण देणाऱ्या या जिल्हा परिषद शाळेचे भौतिक सुविधांनी रुप पालटले असताना परिसरातील विद्यार्थ्यांचा ओढा शाळेकडे वाढला आहे. इयत्ता पहिलीसाठी प्रवेश घेतलेल्या नवोदित विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. गुणवंत व स्टुडंट्स ऑफ द इयर पुरस्कार प्राप्त विद्यार्थ्यांना शाळेच्या मुख्याध्यापिका अनिता काळे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. यावेळी सहशिक्षिका सुरेखा वाघ, शितल आवारे, योगिता वाघमारे, अहिल्या सांगळे आदींसह विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.
प्रारंभी विद्यार्थ्यांनी शिक्षकांचे स्वागत करुन शाळेबद्दल मनोगत व्यक्त केले. इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी इतर शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप केले. तर शाळेसाठी छत्रपती संभाजी महाराजांची प्रतिमा भेट दिली. अनिता काळे म्हणाल्या की, मुलांना शाळेतून जीवनावश्यक शिक्षण मिळणे सर्वात महत्त्वाचे आहे. नवीन शैक्षणिक धोरणातून भारताचा सक्षम नागरिक घडणार आहे. शिक्षणाबरोबरच मुलांना संस्कार व महापुरुषांचे विचार रुजवणे आवश्यक आहे. त्याच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी शिक्षक झटत असतात, शिक्षणाबरोबर कौशल्य निर्माण करण्याचा शिक्षकांचा प्रयत्न आहे. उत्कृष्ट शिक्षक व त्यांना साथ देणारे पालक शिक्षण क्षेत्रात क्रांती घडवून आणू शकतात. नेतृत्व संपन्न विद्यार्थी हि राष्ट्राची संपत्ती आहे. ज्ञानसागरातील राजहंस निर्माण करुन सक्षम पिढी घडविण्याचे कार्य जिल्हा परिषद शाळेच्या माध्यमातून सुरु असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे नियोजन व सूत्रसंचालन जय काजळकर व वेदांत वजन यांनी केले.



# फर्दापूर येथे दोन दुचाकींसह चोरटा केला गजाआड

## सपोनि प्रफुल्ल साबळे यांची कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील फर्दापूर येथील फर्दापूर पोलीस स्टेशन हद्दीतून मोटारसायकल चोरी करणाऱ्या चोरट्यास फर्दापूर पोलिसांनी गजाआड करण्यास पोलिसांना यश आले. त्याच्या ताब्यातून दोन मोटसायकली जप्त करण्यात आल्या. फर्दापूर  येथील शेख अजीज मजित यांची हिरो होंडा पॅशन मोटारसायकल (एमएच २० सीजी १४३६) मंगळवारी (दि.२३) रात्री घरासमोरून चोरीस गेली होती. शेख अजीज यांनी याप्रकरणी फर्दापूर पोलीस ठाण्यात नोंद केली होती. दरम्यान गोपनीय माहितीनुसार फर्दापूर पोलिसांनी बुधवारी दि.२४/४/२४ रोजी रात्री १०.०० वाजता पहूर कसबे ता. जामनेर येथे सापळा रचून आरोपी जुबेर भिकन पठाण (२६) याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून एमएच २० सीजी १४३६ आणि एमएच २० बीएफ ००१७ या क्रमांकाच्या एकूण ६५ हजारांच्या किंमतीच्या मोटारसायकली जप्त करण्यात आल्या. याप्रकरणी आरोपी जुबेर भीकन पठाण विरोधात बुधवारी मध्यरात्री फर्दापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास पो.ना.निलेश लोखंडे, योगेश कोळी करीत आहे.